सोमवार, १४ फेब्रुवारी २०२२ ◆ वर्ष १४ ◆ अंक २०८
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## रेल्वेत आजपासून पुन्हा सुरू होणार खानपान सेवा



**नवी दिल्ली :** देशभरात कोविडचा संसर्ग कमी होत असल्याने गेल्या दीड वर्षापासून बंद असलेली रेल्वे प्रवासातील जेवणाची सुविधा पुन्हा एकदा सुरू होणार आहे. रेल्वे मंत्रालयाने याची माहिती दिली असून सोमवार (दि. १४)पासून प्रवाशांना रेल्वेतील जेवणाचा आस्वाद घेता येणार आहे. रेल्वे मंत्रालयाने आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे की, देशभरातील कोविड संबंधित निर्बंध शिथिल करण्याच्या अनुषंगाने आणि प्रवाशांच्या गरजा लक्षात घेऊन भारतीय रेल्वेकडून १४ फेब्रुवारीपासून पॅन्ट्री कारसह शिजवलेल्या अन्नाची सेवा पुन्हा सुरू करण्यात येणार आहे. रेल्वे प्रवाशांकडून जेवणाची सुविधा सुरू व्हावी, अशी मागणी रेल्वे मंत्रालयाकडे करण्यात येत होती. प्रवाशांच्या या मागणीला रेल्वे खात्याने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे प्रवाशांनी आभार व्यक्त केले आहेत.

अंतरंग
अधिपरिचारिका उद्या करणार हल्लाबोल धरणे आंदोलन/२
दासगावजवळ अपघातात नऊ जण गंभीर जखमी/५
सुभाष पुजारी दुसऱ्यांदा 'मास्टर महाराष्ट्र श्री'/६

# राष्ट्रवादी-शिवसेनेत आता सोशल वॉर
## रायगडातील दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते समाजमाध्यमांवर आक्रमक

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाविकास आघाडी सरकारमधील दोन घटक पक्ष राष्ट्रवादी आणि शिवसेना यांच्यात रायगड जिल्ह्यामध्ये वाद निर्माण झाला आहे. आता यावरून सोशल मीडियातून पोस्टर वॉरही सुरू झाले आहे. त्यामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादी यांच्यातील संघर्ष आणखी वाढण्याची चिन्हे दिसत आहेत.

शिवसेनेचे महाडमधील आमदार भरत गोगावले यांनी काही दिवसांपूर्वी माणगाव येथे पत्रकार परिषद घेऊन रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांना हटविण्याची मागणी केली. याला आपल्या पक्षाचे अलिबागचे आमदार महेंद्र दळवी आणि कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांचाही पाठिंबा असल्याचे आमदार गोगावले यांनी म्हटले होते.



शिवसेनेच्या पालकमंत्री बदलावा या भूमिकेला राष्ट्रवादी काँग्रेसने उत्तर दिले आहे. पालकमंत्री बदलण्याऐवजी महाडचा आमदार बदलण्याची वेळ आली असल्याचे पोस्टर सोशल मीडियावर झळकले आहेत. २०२४मध्ये महाडचा आमदार बदलू हा आमचा शब्द आहे, असे थेट आव्हान राष्ट्रवादीने शिवसेनेला दिले आहे.

पालकमंत्री आदिती तटकरे यांची रायगड जिल्ह्यातील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी 'पुष्पा' चित्रपटातील प्रसिद्ध असलेला डायलॉग वापरून तयार केलेली पोस्ट चर्चेत आहे. 'लडकी समझ के फ्लॉवर समझे क्या, फायर है हम' या पोस्टमुळे शिवसैनिक अधिकच आक्रमक बनले आहेत. राष्ट्रवादीच्या पोस्टरबाजीला प्रत्युत्तर देताना त्यांनी 'कालपण... आजपण आणि उद्यापण शिवसेनाच' या टॅगलाइनने पोस्ट तयार करून ती सोशल माध्यमातून व्हायरल केली जात आहे. महाविकास आघाडी सरकारमध्ये रायगडातील शिवसैनिकांनी फक्त राष्ट्रवादीची भांडी घासायची काय, असा सवालही शिवसैनिक सोशल मीडियावर विचारत आहेत.

राज्यात महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आल्यापासून रायगडात शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये धुसफूस आहे. जिल्ह्याचे पालकमंत्रिपद राष्ट्रवादीचा एकमेव आमदार म्हणून निवडून आलेल्या आदिती तटकरे यांना दिल्याने तीन आमदार असलेली शिवसेना पहिल्यापासूनच नाराज आहे. त्यानंतर वर्चस्ववाद, विकासकामे, निधीवाटप यांच्यावरून दोन पक्षांमध्ये सातत्याने खटके उडत आहेत. हा असंतोष आता उफाळून आला असून दोन्हीकडचे कार्यकर्तेही आक्रमक झाले आहेत.

# आदित्य ठाकरेंना इतिहास माहीत नाही
## विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीसांचे प्रत्युत्तर

**पणजी : वृत्तसंस्था**



गोवा विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान शिवसेना नेते आणि महाराष्ट्राचे पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांनी शनिवारी पणजीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत भाजपवर टीका केली होती. त्याला रविवारी (दि. १३) महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुलाखतीत प्रत्युत्तर दिले. आदित्य ठाकरेंना इतिहास माहीत नाही, असे या वेळी फडणवीस म्हणाले.

भाजपने पाठीत खंजीर खुपसला असे म्हणतानाच आदित्य ठाकरे यांनी भाजपचे नुकसान होऊ नये म्हणून आम्ही आजपर्यंत राज्याबाहेर इतर ठिकाणी उमेदवार उभे केले नाहीत, असा दावा केला होता. यावर बोलताना फडणवीस म्हणाले की, आदित्य ठाकरेंना इतिहास माहीत नाही. याआधी भाजप सोबत असताना पूर्ण ताकदीनिशी शिवसेना गोव्यात उतरली होती, पण गोव्याने प्रत्येक वेळी शिवसेनेला नाकारले. अशी कोणती निवडणूक आहे जिथे भाजप लढतेय म्हणून ते लढले नाहीत? गेली २०-२५ वर्षे हे लोक लढत आहेत, पण त्यांचे डिपॉझिट कधीच वाचत नाही. इतिहास विसरून हे लोक बोलतात.

महाराष्ट्रात भाजपसोबत युतीमध्ये शिवसेना निवडून आली. भाजपच्या स्टेजवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भाजपच्या मुख्यमंत्र्याची घोषणा केली. त्याला तुम्ही समर्थन दिले. तुमच्या सगळ्या लोकांनी पंतप्रधान मोदींचा फोटो लावून मते मागितली. त्यानंतर केवळ मुख्यमंत्रिपदासाठी तुम्ही युतीधर्म मोडला आणि विरोधकांसोबत गेलात. राज्याच्या जनतेला नीट माहिती आहे की कुणी कुणाच्या पाठीत खंजीर खुपसला आहे, असेही फडणवीस म्हणाले.

# अशा सरकारच्या राज्यात जगायची इच्छाच उरलेली नाही -ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे

**अहमदनगर : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात वाइन आमची संस्कृती नाही. तुम्ही त्याची खुल्याने विक्री करताय, ते पाहून मला अशा सरकारच्या राज्यात जगायची इच्छाच उरलेली नाही, असे व्यथित उद्‌गार ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी काढले आहेत. ते रविवारी (दि. १३) प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

राज्य सरकारने सुपरमार्केट आणि वॉक-इन स्टोअर्समध्ये वाईन विक्रीसाठी परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाला भाजपकडून तीव्र आक्षेप घेण्यात आला असून राज्यभरातूनही सरकारविरोधात संताप व्यक्त होत आहेत. अशातच ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी राज्य सरकारने हा निर्णय मागे घ्यावा या मागणीसाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र लिहून येत्या १४ फेब्रुवारीपासून उपोषण करण्याचा निर्णय जाहीर केला होता. दरम्यान, राळेगणसिद्धीत रविवारी झालेल्या ग्रामसभेत ग्रामस्थांनी अण्णा हजारेंना वय लक्षात घेत उपोषण न करण्याचे आवाहन केले. त्यानुसार अण्णांनी उपोषणाचा निर्णय मागे घेतला आहे.



या वेळी अण्णा हजारे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. महाराष्ट्राची संस्कृती जपण्यासाठी कीर्तनकार कीर्तन करतात, पण सरकार किराणा दुकानात वाइन ठेवून ते क्षणात धुळीस मिळवत आहे. हे सर्व बघून आता जगण्याची इच्छा होत नाही, असा संताप अण्णांनी व्यक्त केला. आयुष्याची ८४ वर्षे झालीत, तेवढी पुरेशी आहेत, असे म्हणताना अण्णा भावूक झाल्याचेही पाहायला मिळाले.

**असे निर्णय घेताना सरकारने जनतेच्या भूमिका जाणून घेणे गरजेचे असून तसे न झाल्यास याला लोकशाही कसे म्हणता येईल. ही हुकूमशाहीच आहे.**
**-अण्णा हजारे, ज्येष्ठ समाजसेवक**

या संदर्भात ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लिहिलेल्या पत्रात वाईन विक्रीच्या निर्णयाला विरोध दर्शविला होता. 'काही दिवसांपूर्वी राज्य सरकारने वाईन विक्रीसंबंधी जो धोरणात्मक निर्णय घेतला आहे, त्यानुसार सुपरमार्केट आणि किराणा दुकानांमधून वाईन विक्री सुरू करणे महाराष्ट्रासाठी अतिशय दुर्दैवी आहे. केवळ राज्याचा वाढणारा महसूल आणि वाईन उत्पादक व विक्रेते यांचे हित पाहून हा निर्णय घेतल्याचे दिसून येते, पण या निर्णयामुळे लहान मुले, तरुण व्यसनाधीन होऊ शकतात, महिलांना त्रास होऊ शकतो याचा विचार राज्य सरकारने केलेला दिसत नाही याची खंत वाटते. युवा शक्ती ही आमची राष्ट्रशक्ती आहे. ती बरबाद करू पाहणाऱ्या निर्णयाला विरोध करण्याशिवाय पर्याय नाही. वाईन ही दारू नाही असा दुर्दैवी युक्तिवाद सरकारकडून करण्यात येत आहे हेही आश्चर्यकारक आहे,' असे अण्णांनी म्हटले होते.

## निवडक

### 'एबीजी शिपयार्ड'चा बँकांना तब्बल २२,८४२ कोटींचा चुना

**अहमदाबाद :** एबीजी शिपयार्ड कंपनीने २८ बँकांना तब्बल २२,८४२ कोटींचा चुना लावल्याचा प्रकार समोर आला आहे. या कंपनीविरोधात सीबीआयने गुन्हा दाखल केला आहे. शनिवारी दिवसभर या कंपन्यांच्या कार्यालयांवर सीबीआयकडून छापेमारी सुरू होती. हा आतापर्यंत उघड झालेल्या सर्वांत मोठ्या घोटाळ्यापैकी एक मानला जात आहे.

### आयपीएल : ११.५० कोटींसह लिव्हिंगस्टोन पंजाब संघात

**बंगळुरू :** आयपीएलच्या मेगा ऑक्शनमध्ये रविवारी (दि. १३) इंग्लंडचा फिरकी अष्टपैलू खेळाडू लियाम लिव्हिंगस्टोनला आपल्या ताफ्यात दाखल करून घेण्यासाठी पंजाब किंग्ज आणि गुजरात टायटन्स संघांमध्ये चुरस पहायला मिळाली. अखेर पंजाबने ११.५० कोटी रुपये मोजून लिव्हिंगस्टोनला आपल्याकडे वळविले.

# पालीमध्ये एकाच रात्रीत चार ठिकाणी झाली चोरी



(छाया : धम्मशील सावंत)

**पाली : प्रतिनिधी**

पाली व उन्हेरे फाट्यावर चार ठिकाणी चोऱ्या झाल्या आहेत. चोरट्यांनी घर, बियर शॉपी व गोडाऊन फोडून ऐवजाची चोरी केली तसेच दुचाकीही पळवून नेली आहे. याबाबत पाली पोलीस ठाण्यात शनिवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला. आता चोरट्यांना शोधून काढण्याचे मोठे आव्हान पोलिसांपुढे आहे.

या संदर्भात पाली पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार पालीतील कासारआळीत राहणाऱ्या संगीता पाशिलकर यांच्या बंद घराच्या खिडकीचे लोखंडी ग्रील तोडून चोरटे घरात शिरले आणि त्यांनी ४२ हजारांची रोख रक्कम चोरली. या चोरट्यांनी उन्हेरे फाट्यावरील गौरी बियर शॉपीमधील १४ हजार ४६० रुपये किमतीचे चार बिअर बॉक्स व सहा हजार रुपये चोरून नेले. त्याचप्रमाणे बसस्थानकाजवळील सम्राट सुपर मार्केटच्या गोडाऊनच्या गल्ल्यातील पाच हजार रुपये चोरले. याचबरोबर बल्लाळेश्वर नगरातील साजेकर चाळीत राहणारे संतोष यादव यांची घराबाहेर लावलेली २० हजार रुपये किमतीची मोटरसायकल पळवून नेली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

पालीत एका रात्रीत एवढ्या चोऱ्या झाल्याने चोरांचा सुळसुळाट वाढला असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी आणि ती कायम ठेवावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.



**खारघर : महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशनच्या वतीने महाराष्ट्र श्री किताबासाठी राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेचे आयोजन शनिवारी करण्यात आले होते. या स्पर्धेला पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. भाजप नेते तथा खारघरचा राजा मंडळाचे अध्यक्ष विजय पाटील, युवा नेते समीर कदम हेही उपस्थित होते. या वेळी परेश ठाकूर यांनी मास्टर महाराष्ट्र श्री हा बहुमान दुसऱ्यांदा पटकाविणारे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांचा सत्कार केला.**

# निर्बंध शिथिलतेमुळे पर्यटन क्षेत्र बहरले
## रायगडातील समुद्रकिनारी तुफान गर्दी | स्थानिक व्यवसाय तेजीत


**मुरूड : प्रतिनिधी**

कोरोनाची तिसरी लाट ओसरल्याने शासनाने टप्प्याटप्प्याने निर्बंध शिथिल केले. त्या त्या विभागातील कोरोनाच्या रुग्णसंख्येनुसार तेथील स्थानिक प्रशासनाने निर्बंध हटविले. त्यामुळे नागरिकांची पावले पर्यटन क्षेत्राकडे वळू लागली आहेत. रायगडातील समुद्रकिनारे पर्यटकांनी बरहलेले दिसू लागले आहेत. पर्यटकांच्या येण्याने तेथील स्थानिकांचे व्यवसायही तेजीत आले आहेत.

मुरूड व काशीद समुद्रकिनारी शनिवार, रविवार सुटीत पर्यटकांनी तुफान गर्दी केली होती. त्याचबरोबर सुप्रसिद्ध जंजिरा किल्ला पाहण्यासाठीसुद्धा मोठी गर्दी दिसून आली. गेल्या दोन दिवसांत २५ हजारांपेक्षा जास्त पर्यटक या ठिकाणी भेटी देऊन गेले आहेत.

पर्यटकांची संख्या वाढल्याने हॉटेल, लॉजिंग व्यवसाय तेजीत होते. सर्वाधिक गर्दी काशीद येथे आढळून आली. येथे पर्यटकांच्या वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. लोक मोठ्या संख्येने समुद्रकिनारी दिसून आले.

जंजिरा किल्ल्याप्रमाणेच आता फणसाड अभयारण्यसुद्धा पर्यटकांना खुले करण्यात आले आहेत. त्यामुळे पुढील आठवड्यात यापेक्षा जास्त गर्दी होण्याचे संकेत मिळत आहेत. राजपुरी नवीन जेट्टी व खोरा बंदर येथून पर्यटकांना शिडाच्या व मशीन बोटीद्वारे जंजिरा किल्ल्यावर नेले जाते. या भागात मोठी गर्दी आढळून आली. खोरा बंदर येथेही रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाहनांची तोबा गर्दी होती. त्याचप्रमाणे राजपुरी नवीन जेट्टी येथेसुद्धा गर्दी दिसून आली.



(छाया : संजय करडे)



# राहुल बजाज अनंतात विलीन
## पुण्यात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**पुणे : प्रतिनिधी**

ज्येष्ठ उद्योजक राहुल बजाज यांचे शनिवारी पुण्यात निधन झाले. त्यांच्यावर रविवारी (दि. १३) पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

राहुल बजाज यांचे पार्थिव त्यांच्या पिंपरी-चिंचवड येथील निवासस्थानी आणण्यात आले होते. तिथे नेतेमंडळी आणि प्रतिष्ठीत मान्यवरांनी अंत्यदर्शन घेतले. कामगारांनीही अंत्यदर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली. बजाज यांच्या जाण्याने कामगारवर्गावर शोककळा पसरली आहे.


॥ श्री गजानन प्रसन्न ॥
सप्रेम नमस्कार वि. वि.
आमचे येथे श्री कृपेकरून स्वर्गीय परमपुज्य
जनार्दन आत्माराम भगत व स्व. बयवबाई जनार्दन भगत
यांच्या पवित्र स्मृतिस अभिवादन करून यांची नात

चि. सौ. कां. स्वराली
(श्री. व सौ. सुभद्रा प्रभाकर नारायण पाटील यांची नात श्री. व सौ. सुजाता संजय जनार्दन भगत, रा. शेलघर, ता. पनवेल यांची कन्या)

चि. कृपेश
(स्व. सत्यभामाबाई कृष्णाजी महादेव कांडपिळे यांचा नातू श्रीमती. छाया जनार्दन कृष्णाजी कांडपिळे, रा. पोदी, ता. पनवेल यांचा पुत्र)

यांचा शुभविवाह

मिती माघ शु. १३. शके १९४३, सोमवार दिनांक १४/०२/२०२२ रोजी सायं. ०५:११ मि. या शुभ मुहुर्तावर करण्याचे योजिले आहे. कार्यसिध्दीस नेण्यास श्री समर्थ आहेत, तरी आपण या मंगल प्रसंगी सहकुटूंब, सहपरिवार उपस्थित राहून वधु-वरांस शुभाशिर्वाद द्यावेत, हि नम्र विनंती.

आपले नम्र
श्री. व सौ. सीमा प्रकाश जनार्दन भगत
श्री. व सौ. हेमलता अजय जनार्दन भगत
श्री. व सौ. सुजाता संजय जनार्दन भगत
श्री. व सौ. स्नेहल रोहन अजय भगत
श्री. व सौ. स्वाती सुयोग प्रकाश भगत
श्री. व सौ. अस्मिता अनुप अजय भगत
श्री. व सौ. समिता विश्वनाथ बाळाराम पाटील

हळदी समारंभ
रविवार दि. १३/०२/२०२२
सकाळी ९:३० वाजता,
निवासस्थानी.

विवाह स्थळ
रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, सेक्टर १७,
उलवे नोड, पनवेल, रायगड,

हीच आमंत्रण पत्रिका समजून विवाह सोहळ्याला यावे ही विनंती.

# संजय राऊतांमुळे आमचे मनोरंजन

## देवेंद्र फडणवीसांचा खोचक टोला





### हे महाराष्ट्र बंगालच्या दिशेने नेताहेत!

*गावोगावी आमच्या लोकांवर रोज खटले भरले जात आहेत. पोलीस एकतर्फी वागत आहेत. गोपीचंद पडळकरांना मारून टाकण्याचा प्रयत्न झाला, पण त्यांना एक बॉडीगार्ड द्यायला सरकार तयार नाही आणि हे एजन्सीच्या दुरुपयोगावर बोलतात. माझा सवाल आहे की महाराष्ट्रात लोकशाही तरी आहे का? हे महाराष्ट्र बंगालच्या दिशेने न्यायला लागले आहेत. बंगालमध्ये सरकारविरोधात बोललं की हातपाय तोडून टाकले जातात. किरीट सोमय्यांवर मोठा दगड टाकण्याचा प्रयत्न केला. नशीबाने ते वाचले. त्यामुळे मला वाटते एजन्सीबाबत बोलण्याचा अधिकार त्यांना नाही, अशी टीका फडणवीसांनी केली.*

**मुंबई : प्रतिनिधी**

देशभरात सध्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांची जोरदार चर्चा सुरू आहे. शिवसेनेने गोवा विधानसभा निवडणुकांमध्ये ११ जागी उमेदवार उभे केले असून खासदार संजय राऊत आणि राज्याचे पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे नुकतेच गोव्यात प्रचार करून परतले आहेत. या पार्श्वभूमीवर संजय राऊतांनी केलेल्या आरोपांवर विरोधी पक्षनेते आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संजय राऊतांमुळे आमचे मनोरंजन होते, अशी खोचक टीका केली.

ईडी-सीबीआयच्या गैरवापराचा आरोप देवेंद्र फडणवीसांनी या वेळी फेटाळून लावत उलट महाराष्ट्र सरकारवरच आरोप केले आहेत. संजय राऊत जे बोलतात, त्याने आमचे मनोरंजन होते. कारण ते सकाळी वेगळे बोलतात, संध्याकाळी वेगळे बोलतात. जर तक्रारी होत असतील, त्यात तथ्य आढळत असेल आणि त्यावर यंत्रणांनी कारवाई केली तर तो दुरुपयोग आहे का? अनिल देशमुखांबाबत जे खुलासे येत आहेत, ते पाहूनही तुम्ही ईडीची कारवाई चुकीची म्हणाल? अनिल देशमुख जे काही सत्ताधारी आघाडीच्या नेत्यांबद्दल बोलत आहेत, त्यांच्याबद्दल ईडीने शांत बसावे का? ही दुटप्पी भूमिका आहे. ईडीने कोणतीही चुकीची कारवाई केली असेल, तर ती दाखवून दिली पाहिजे. त्यासाठी न्यायालयातही जायला हवे. न्यायालय थांबवेल ते. आज या सरकारच्या माध्यमातून पोलिसांचा जो गैरवापर चालला आहे, अशा १०० घटना मी सांगू शकतो, असा दावा देवेंद्र फडणवीसांनी केला.

अमरावतीमध्ये आयुक्तांवर शाई फेकण्याच्या झालेल्या प्रकारावर बोलताना फडणवीस म्हणाले की, अमरावतीमध्ये आयुक्तांवर शाई फेकणे चुकीचे आहे ते कुणीही केले असेल तर त्यावर कारवाई झाली पाहिजे. त्याचा आम्ही निषेध करतो, पण त्याचवेळी जे रवी राणा तिथे नाहीत, त्यांच्यावर तुम्ही कोणत्या अधिकारात ३०७ कलम लावता? त्याच न्यायाने किरीट सोमय्यांवर जो हल्ला झाला, त्यासाठी रवी राणांचा न्याय संजय राऊतांना का नाही?, असा सवाल देवेंद्र फडणवीसांनी या वेळी उपस्थित केला.

# अधिपरिचारिका उद्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करणार आंदोलन



**अलिबाग : प्रतिनिधी**

अधिपरिचारीका प्रशिक्षणास २०१७पासून सुरुवात करून २०१९-२०२० मध्ये उत्तीर्ण झालेल्या बंधपत्रात सर्व अधिपरिचारिकांना १८ महिन्यांचे नियुक्ती पत्र मिळाले नाही. त्यामुळे मंगळवारी (दि.१५) रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर समाज क्रांती आघाडी संघटनेच्या माध्यमातून बेमुदत हल्लाबोल धरणे आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती संघटनेचे जिल्हा अध्यक्ष बी. जी. पाटील यांनी येथे पत्रकार परिषदेत दिली. या आंदोलनामध्ये जिल्ह्यातील अन्यायग्रस्त अधिपरिचारिका सहभागी होतील, असे पाटील यांनी सांगितले.

**१८ महिन्यांचे नियुक्तीपत्र देण्याची मागणी**

अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात ऑगस्ट २०१७ पासून जीएनएम प्रशिक्षणास १५ विद्यार्थ्यांनी सुरुवात करून २०१९-२० मध्ये आपले प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले. त्यानंतर उत्तीर्ण झालेल्या बंधपात्र अधिपरिचारिकांना संबंधित आरोग्य अधिकारी व कार्यालय येथे वारंवार भेट देऊन अर्ज-विनंत्या करूनसुद्धा नियमाप्रमाणे १८ महिन्यांचे नियुक्ती आदेश मिळत नाहीत. जिल्ह्याच्या मेरिटलिस्टमध्ये येऊन या प्रशिक्षणासाठी आमची निवड झाली आहे. मेहनत घेऊन अभ्यास करून आम्ही उत्तीर्ण झालो आहेत, परंतु आज आम्ही बेरोजगार आहोत.

प्रशिक्षण चालू असतानासुद्धा कोरोना महामारीच्या आपत्तीतदेखील आम्ही रुग्णसेवेचे काम केले आहे, मात्र आता नियुक्ती मिळत नसल्याने आम्ही आर्थिक व मानसिक तणावात आहोत. त्यामुळे नाईलाजाने आमच्यावर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १५ फेब्रुवारीपासून हल्लाबोल धरणे आंदोलन करण्याची वेळ ओढवली आहे. त्यामुळे आमच्या मागण्या शासनापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न आहे, असे या वेळी पत्रकार परिषदेस उपस्थित अधिपरिचारिकांनी सांगितले.

समाज क्रांती आघाडी संघटनेच्या माध्यतातून मुंबई येथील उपसंचालक आरोग्य सेवा, आयुक्तालय मंत्रालयातील आरोग्य उपसचिव, उपसंचालक आरोग्य विभाग मुंबई मंडळ ठाणे या ठिकाणी अधिकारी वर्गांना प्रत्यक्ष भेट घेऊन प्रशिक्षण पूर्ण केलेल्या अधिपरिचारिकाना सलग १८ महिन्यांची नियुक्ती पत्र मिळण्याबाबत पाठपुरावा करण्यात आला आहे, मात्र शासन याबाबत योग्य ती दखल घेताना दिसत नाही. विशेष म्हणजे पुणे आणि लातुर येथील प्रशिक्षण पुर्ण केलेल्या अशाच अधिपरिचारिकांना नियुक्ती पत्र देण्यात आलेली आहेत. त्यामुळे सर्वांना समान न्याय मिळावा या दृष्टीने राज्य शासनाने कार्यवाही करावी.

राज्य शासनाने प्रशिक्षण पुर्ण केलेल्या अधिपरिचारिकांना त्वरित १८ महिन्यांचे नियुक्ती पत्र द्यावे, या मागणीसाठी समाज क्रांती आघाडीच्या माध्यमातून हल्लाबोल आंदोलन करण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यात १५ तर संपूर्ण राज्यात सुमारे ६०० प्रशिक्षण पुर्ण केलेल्या अधिपरिचारिका यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आंदोलन सुरू करण्यात येत आहे. यात संघटनेला निश्चित यश येईल, असा विश्वास संघटनेचे जिल्हा अध्यक्ष बी.जी. पाटील यांनी या पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

या पत्रकार परिषदेस समाज क्रांती आघाडीचे जिल्हा सचिव किशोर पाटील, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद घेवदे, पुष्पा पाटील, अधिपरिचारिका व त्यांचे पालक उपस्थित होते.

## खोपोलीत आरएसएसतर्फे लतादीदी, रमेश देव यांना आदरांजली

**खोपोली : प्रतिनिधी**

येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) वीरेश्वर व्यवसायी प्रभात शाखेच्या वतीने दिवंगत गानसम्राज्ञी भारतरत्न लता मंगेशकर आणि दिवंगत अभिनेते रमेश देव यांना आदरांजली वाहण्यात आली.

जिल्हा कार्यकारिणी सदस्य रोहित कुलकर्णी यांनी लता दीदी आणि रमेश देव यांचा जीवनपट उपस्थितांसमोर उलगडून दाखवला. त्यानंतर तेजस जोशी यांनी लता दीदीं चे गाणे सादर करून लतादीदींना आदरांजली वाहिली तर गायक प्रकाश शहा यांनी लतादीदींचे गाजलेले 'ए मेरे वतन के लोगो' हे गाणे सादर करून सांगितीक आदरांजली अर्पण केली.

या वेळी नगर कार्यवाह दीपक कुवळेकर, सहकार्यवाह अभिषेक नागर, माजी तालुका संघचालक राकेशजी पाठक, जनकल्याण समितीचे जिल्हा कार्यवाह नितीन भावे, सुधाकर भट, दिलीप निकम, देवेंद्र जाखोटिया यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## पनवेलमध्ये माल वाहतूक करणाऱ्या ट्रकला आग



**पनवेल : वार्ताहर**

सायन-पनवेल महामार्गावरील कामोठे पुलाजवळ माल वाहतुक करणाऱ्या ट्रकला रविवारी (दि. १३) अचानकपणे आग लागली. या आगीमुळे ट्रकचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

आगीची माहिती मिळताच अग्नीशमन दलाने घटनास्थळी जाऊन आग विझवली. ही आग कशामुळे लागली याचे कारण अद्यापही स्पष्ट झाले नाही.

### माणगाव गोळीबार प्रकरण

## आरोपींची मोटरसायकल सापडली

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील कचेरी रोड मार्गावर शनिवारी रात्री दुचाकीवरून आलेल्या दोघा अज्ञात व्यक्तींनी मेडिकलचे दुकान बंद करून पायी चालत जाणाऱ्या तरुणावर पिस्तुलातून गोळ्या झाडल्या. या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींची पल्सर मोटरसायकल (एमएच ४३-एएस ६६७४) माणगावजवळील एक किमी अंतरावर असणाऱ्या कलमजे पुलाजवळ रस्त्याच्या कडेला सापडल्याची माहिती माणगाव पोलिसांनी दिली.

दरम्यान, या घटनेतील जखमी तरुणाला अधिक औषधोपचाराकरीता मुंबईला हलविण्यात आले. त्याची प्रकृती ठीक असल्याची माहिती त्याच्या नातेवाईकांनी दिली. माणगावात घडलेल्या या घटनेचा विविध संस्था संघटनांनी निषेध केला असून मुंबई, ठाणे, पुणे याठिकाणी वरचेवर होणारी गुंडगिरी आता माणगावात आली काय, अशा भावना नागरिकांतून व्यक्त होत असून या हल्ल्याप्रकरणी माणगावात भीतीचे वातावरण तयार झालेय. या हल्ल्यातील आरोपींना लवकरात लवकर पोलिसांनी अटक करावी अशी मागणी होत आहे.

या घटनेचा तपास माणगाव पोलीस वेगाने करीत आहेत. ही घटना ज्या ठिकाणी घडली त्याठिकाणचे सीसीटिव्ही फुटेज पोलिसांनी तपासले असता त्यात मोटारसायकलसह दोन अज्ञात व्यक्ती एकाने तोंडाला रुमाल बांधलेले व एकाने हेल्मेट घातलेला दिसत होता.



# नेरळ येथे रुग्णोपयोगी साहित्य केंद्राचे उद्घाटन



**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

नेरळ येथील कै. बापूराव धारप सभागृहामध्ये नव्याने सुरू झालेल्या रुग्णोपयोगी साहित्य केंद्राचे उद्घाटन रविवारी (दि. १३) करण्यात आले. या वेळी नेरळमधील डॉ. अश्विनी कर्वे यांनी हे रुग्णोपयोगी साहित्य केंद्र हे रूग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी आधार केंद्र बनेल, असा विश्वास व्यक्त केला. यासोबतच 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती गेली ४९ वर्षे महाराष्ट्रामध्ये गरीब, गरजूंसाठी, वनवासी वाड्यांवर, आपत्तीमध्ये अविरत सेवेचे कार्य करीत आहे, असेही सांगितले.

नेरळ येथील रुग्णोपयोगी साहित्य केंद्राच्या उद्घाटनाच्या वेळी समितीचे कोकण संभाग सहकार्यवाह आनंद राऊळ, कुलाबा जिल्हा कार्यवाह नितीन भावे, संघाचे कर्जत तालुका कार्यवाह संतोष देशमुख आदी व्यासपीठावर उपस्थित होते. सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि भारतमाता पूजन झाल्यानंतर जिल्हा कार्यवाह नितीन भावे यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये जनकल्याण समितीचे यंदाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष असून कुलाबा जिल्ह्यामध्ये नवीन ५० सेवा प्रकल्प सुरू करणार असल्याची माहिती दिली. रुग्ण उपयोगी साहित्य केंद्र हे रूग्णा बरोबरच त्यांच्या कुटुंबियांशी जोडणारा दुवा ठरेल अशी आशा व्यक्त केली.

संभाग सहकार्यवाह आनंद राऊळ यांनी जनकल्याण समिती महाराष्ट्र प्रांतामध्ये सात आयामांमध्ये सुरू असलेल्या १५८० हून अधिक सेवा कार्यांची विस्ताराने माहिती दिली. संतोष देशमुख यांचेही याप्रसंगी समयोचित भाषण झाले. शांती मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. जिल्हा कोषाध्यक्ष संजीवजी दातार यांनी उपस्थितांचे स्वागत केले. ऋचा कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर शेवटी ओंकार भडसावळे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाला तालुका सहकार्यवाह श्रीहरी काळे, डॉ. अशोक कर्वे, विहिपचे प्रखंड मंत्री ओंकार जोशी, आनंद काळे, महेश निगोजकर, बंडू काळे, केतन शिंदे, प्रयुश पारेख, अक्षय जोशी इत्यादी यांच्यासह नेरळ मधील नागरिक उपस्थित होते. प्रमोद भडसावळे आणि रमेश कुलकर्णी हे रुग्ण उपयोगी साहित्य केंद्रामध्ये सेवा देणार आहेत.


## 'सहयोग'च्या वर्धापन दिनानिमित्त व्याख्यान

**अलिबाग, रेवदंडा : प्रतिनिधी**

येथील सहयोग पतसंस्थेच्या वतीने डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचे भारतीय विद्यमान अर्थव्यवस्था या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. मेघा चित्रमंदिर येथे मंगळवारी (दि. १५) सायंकाळी ४ वाजता हे व्याख्यान होणार असून सर्वासाठी खुले असणार आहे.

सहयोग पतसंस्थेच्या वतीने वर्धापन दिनाचे औचित्य साधून बँकीग विथ थिंकीग या उपक्रमा आंतर्गत या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या वर्षी मुंबई विद्यापिठाचे माजी कुलगुरू, नियोजन आयोगाचे माजी सदस्य आणि माजी खासदार तसेच अर्थविषयक घडामोडींचे जाणकार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय विद्यमान अर्थव्यवस्था या विषयावर ते उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

हा कार्यक्रम पतसंस्थेचे सभासद, हितचिंतक आणि सर्वजनतेसाठी खुला असणार आहे. या व्याख्यानासाठी नागरीकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष योगेश मगर, संचालक मंडळ आणि कर्मचारी वर्गाच्या वतीने करण्यात आले आहे.

**पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**सोमवार, दि. १४ फेब्रुवारी २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. क्रीडा संकुल, एचओसी, पनवेल
- ३. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ४. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ७. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर-६, कामोठे
- ८. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ९. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- १०. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ११. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १३. आंबेडकर भवन, पनवेल ■ १४. सेंट्रल रेल्वे, पनवेल
- १५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली ■ १६. मनस्मृती रोटरी सेंटर, खारघर
- १७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- १८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

**कोवॅक्सिन लसीचा तुटवडा असल्याकारणाने १५ ते १८ वयोगटातील तसेच त्यावरील नागरीकांचे लसीकरण होणार नाही याची नोंद घ्यावी.**


# वीटभट्टी कामगारांच्या मुलांना मार्गदर्शन

### सहजसेवा फाउंडेशनचा उपक्रम

**खालापूर : प्रतिनिधी**

सहजसेवा फाउंडेशनच्या वतीने खोपोली येथील वीटभट्टी कामगारांच्या मुलांसाठी सुरू झालेल्या सहज निसर्ग शाळेत रविवारी (दि. १३) कर्जतच्या पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की यांनी विद्यार्थ्यांना चांगला स्पर्श व वाईट स्पर्शचे धडे दिले. पोलिसी गणवेशात सुवर्णा पत्की यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे दिले. याचसोबत महिलांना मासिक पाळीत घ्यावयाची काळजी, आहार पोषण व सामाजिक सुरक्षिततेचे धडे समजून सांगितले.

या वेळी पत्की यांनी महिलांना सॅनिटरी नॅपकिन व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले. खोपोली येथील फाइन फोटो स्टुडिओचे मुकतार शेख यांनी विद्यार्थ्यांच्या ओळखपत्रासाठी निशुल्क फोटो काढून दिले तसेच पोषण आहारासाठी सहजसेवा फाउंडेशनचे उरण तालुकाप्रमुख सुरेश हरिभाऊ पाटील, ज्योती भुजबळ, महेश मोदी यांनी सहकार्य केले.




नकुल देशमुख, इशिका शेलार, जयश्री भागेकर, अखिलेश पाटील व बी. निरंजन हे शिक्षकरूपात सातत्यपूर्ण योगदान देत आहेत. या उपक्रमात कर्जत पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल रुपेश म्हात्रे व सहजसेवा फाउंडेशनच्या जनसंपर्क प्रमुख जयश्री कुलकर्णी उपस्थित होत्या.

**दुखवटा**

## मालती मेथा

**माणगाव :** माणगाव तालुका पत्रकार संघाचे ज्येष्ठ सल्लागार व मार्गदर्शक तथा प्रतिष्ठित व्यापारी विजय मेथा आणि माणगाव अशोक साबळे विद्यालयाचे स्कूल कमिटी चेअरमन राजन मेथा यांच्या मातोश्री मालती चुनीलाल मेथा (वय ८७) यांचे शनिवारी (दि. १२) निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, एक मुलगी, जावई, सुना, बारा नातवंडे असा परिवार आहे. कै. मालती मेथा यांच्यावर रविवारी (दि. १३) सकाळी ९ वाजता त्यांच्यावर माणगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा उत्तरकार्य विधी गुरुवारी (दि. २४) माणगाव येथील घरी होणार आहे.



# नवी मुंबई मनपाकडून कारवाईमध्ये भेदभाव?

## ▌सिडको वसाहतीतील बेकायदा बांधकामांकडे दुर्लक्ष ▌गावठाणातील घरांवर हातोडा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून तोडक कारवाई करतांना गावठाणातील बांधकामांना लक्ष केंद्रित केले जाते. असे असताना सिडको वसाहतीतील बेकायदेशीर उभे राहत असलेल्या इमल्याकडे सोपीस्करपणे दुर्लक्ष केले जात आहे. गाव आणि शहर असा भेदभावामुळे अतिक्रमण विभागाच्या कारवाईबाबत प्रश्न निर्माण झाला आहे.

नवी मुंबईतील मूळ गावांचा गावठाण विस्तार झाला नसल्याने तसेच सिडकोने प्रकल्पग्रस्तांना भुखंड वाटपात केलेल्या दिरंगाईमुळे प्रकल्पग्रस्तांनी गावठाण भागात गरजेपोटी घरे बांधली आहेत. ही घरे नियमित करण्याची प्रकल्पग्रस्तांच्या मागणीवर राज्य सरकारने अद्याप कोणताही निर्णय घेतला नसतांना गरजेपोटी घरे पालिका आणि सिडकोने अनधिकृत ठरवत ती तोडण्याची कारवाई सुरू असते. गेल्या महिनाभरात नेरूळगाव ऐरोली, घणसोली,





कोपरखैरणे आदी भागांत पालिकेने तोडक कारवाईत अनेक बांधकामे तोडली आहेत.

एकीकडे गावठाणातील बांधकामावर कारवाई करीत असताना सिडकोने अल्प उत्पन्न गटासाठी दिलेली घरे कोणत्याही प्रकारे अतिरिक्त चटई क्षेत्र मजूर नसतांना तीन ते चार चटई क्षेत्राचा वापत करून मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू आहेत. नेरूळमधील क्षेत्र २ मधील सेक्टर २, ८ आणि १०मधील ठिकाणी, तर निवासी वापराच्या जागेत व्यावसायिक वापर सर्रास करण्यात येत आहे. सिडको वसाहतीतील बेकायदेशीर सुरू असलेल्या बांधकामासाठी पालिकेचे पिण्यासाठी वापरण्यात येणारे पाण्याचा वापर केला जातो. पालिकेची कोणतीही परवानगी न घेता मलवाहिनी परस्पर चांगले रस्ते तोडून जोडली जाते. याचा परिणाम हा करदात्या नागरिकांच्या नागरी सुविधावर पडत आहे. बांधकामे ही अनधिकृत असतांना पालिका अशा बांधकामांना मालमत्ता करात सवलत आणि पाणी बिलदेखील सवलीतीचे देते. सिडको वसाहतीमध्ये सुरू असलेल्या बांधकामविरोधात अनेक तक्रारी करूनदेखील त्यांना संरक्षण देण्याचे काम पालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून केला जात असल्याचे दिसून येते.

दरम्यान, याबाबत नवी मुंबई मनपा अतिक्रमण विभाग प्रमुख अमरीश पटनिगिरी यांना विचारले असता, नवी मुंबई मनपा हद्दीतील सर्वच अनधिकृत घरांवर कारवाई सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.



# रोडपालीत विशेष स्वच्छता मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त स्वच्छतेने परिपूर्ण प्रभाग कार्यक्रम राबविण्यात आला. यामध्ये प्रभाग समिती 'ब' कळंबोली येथे रविवारी (दि. १३) सेक्टर ८इ धारण तलाव (होल्डिंग पॉईंट) येथे विशेष जनजागृती स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

पनवेल महानगरपालिका व साई समाज विकास संस्था (नेरूळ) गंगा सागर फाउंडेशन (नेरूळ) क्रीट टोगेथेर फाउंडेशन (कळंबोली) यांच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम घेण्यात आली.

या वेळी पनवेल महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, आरोग्य निरिक्षक अरुण कांबळे, स्वच्छता निरीक्षक अजिंक्य दळवी, स्वच्छता पर्यवेक्षक हरेश कांबळे, सामाजिक कार्यकर्ते राजीव सिन्हा, अभिजित चव्हाण, दीपक विश्वकर्मा, सय्यद अमीर, निवृत्त आरोग्य निरीक्षक दौलत शिंदे व नागरिक तसेच तिन्ही संस्थेचे संपूर्ण टीम व साई गणेश एंटरप्राइजचे सुपरवायझर प्रमोद भोईर, हर्षद पाटील, अक्षय पाखरे, हरीश खोंडे, विजय तांबे व स्वच्छता दूत उपस्थित होते.

# एनएमएमटी बस जळून खाक

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई परिवहन सेवेची नवी मुंबई–डोंबिवली अशी सेवा देणारी बस रविवारी सकाळी मानपाडा येथे जळून खाक झाली. ब्रेक डाऊन झाल्याने हे बस रस्त्याकडेला उभी करून रिपेअर केली जात होती. त्या दरम्यान बसमध्ये शॉर्ट सर्किट होऊन बसला आग लागली त्यात संपूर्ण बस जळून खाक झाली. सुदैवाने यात कोणासही दुखापत झाली नाही.



महालक्ष्मी कंत्राटदारकडून चालवल्या जाणाऱ्या घणसोली डेपोतील ही बस होती. नवी मुंबई ते डोंबिवलीदरम्यान या बसने सेवा पुरवली जाते. रविवारी सकाळी बसचा मानपाडा येथे या बसचा ब्रेक डाऊन झाला होता. त्यामुळे बस वाहकाने प्रवाशांना दुसऱ्या बसमध्ये प्रवासाची व्यवस्था करून दिली होती तसेच डेपोतील दुरुस्ती करणाऱ्यांकडून बसची दुरुस्ती सुरु होती. त्या दरम्यान शॉर्ट सर्किट झाल्याने आग लागली. आग प्राथमिक अवस्थेत असल्याने बसमध्ये असलेल्या अग्निरोधक सिलेंडरमधून ती आग विझवण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र ती सिलेंडर अपुरी पडली.

अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले होते, मात्र ट्रॅफिक जाममुळे वेळेवर अग्निशामक दल पोहोचू शकले नाही. त्यामूळे आगीने भडका घेत संपूर्ण बस जळून खाक झाली. यात कोणासही दुखापत झाली नसल्याचे नवी मुंबई परिवहन व्यवस्थापक योगेश कडूस्कर यांनी माहिती देताना सांगितले.



**पनवेल : श्री बालाजी कार्डिक ॲम्ब्युलन्सचे मालक राज निंबर्गी यांच्या नवीन रुग्णवाहिकेचे उद्घाटन भाजपचे युवा नेते केदार सुरेश भगत ह्यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सोमनाथ पवार, नितीन कसबे, महेंद्र पाटील, हर्षद गडगे, योगेश साळवी, गौरव सावंत, नितेश भगत, संकेत दसवते, सुमित दसवते, भावेश शिंदे, यज्ञेश पाटील, अथर्व पाटील, साहिल मोरे, इम्रान खान, संतोष निम्बार्गी, विजय जाधव, योगेश कुलकर्णी उपस्थित होते.**

# नवी मुंबईत भाजपतर्फे रक्तदान शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष सीवुड्स विभाग आणि राईराज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने महारक्तदान शिबिराचे आयोजन भाजपचे माजी नगरसेवक भरत जाधव यांच्या वतीने रविवारी सिवूडस येथे करण्यात आले होते. या वेळी आमदार प्रसाद लाड यांनी या शिबिरास भेट देऊन रक्तदात्याना प्रोत्साहीत केले.

या शिबिरात १४० बॉटल्स रक्तसंकलन करण्यात आले. नवी मुंबई ब्लड बँकच्या टीमचे सहकार्य लाभले. शिबीर यशस्वी होण्यासाठी विनायक गिरी, सुधाकर जाधव, रणजित निंबाळकर, आदित्य जाधव, कैलास तरकसे प्रसाद गोंधळीकर आदींनी मोलाचे सहकार्य केले.



## निवडक

### पनवेलमधील बंदर रोड येथे घरफोडी

**पनवेल :** एका बंद घरात अज्ञात चोरट्यांनी केलेल्या घरफोडीत लाखोंचा ऐवज चोरून नेल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. शहरातील बंदर रोड येथील कोनार्क प्लाजा सोसायटीतील दुसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या अल्ताफ नमरे यांच्या घराच्या दरवाज्याचे लॅच व लॉक कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी कशाच्या तरी सहाय्याने तोडून घरात प्रवेश केला. चोरट्यांनी घरातील सोन्या चांदीचे दागिने व रोखरक्कम असा मिळून तीन लाख ५८ हजार ३२० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### वीर वाजेकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम

**उरण :** श्रमजीवी जनतेचे नेते, उरणचे भाग्यविधाते स्वर्गीय



तुकाराम हरी वाजेकर यांची ४१ वी पुण्यतिथी मंगळवारी (दि. १५) सकाळी १० वाजता उरण पेठा मिठागर कामगार संघ कार्यालय कोटनाका उरण शहर येथे अभिवादन करण्यात येणार आहे. यासोबतच राजपाल नाका ते राघोबा मंदिर या मार्गाचे 'तुकाराम हरी वाजेकर' या नामफलकाचे अनावरण विद्यमान आमदार महेश बालदी यांच्या हस्ते होणार आहे. उरणमधील सर्व ज्येष्ठ सभासद, नागरिकांनी या कार्यक्रमाला वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन उरण पेठा मिठागर कामगार संघटनेचे बा. ध. पाटील, उरण पेठा मीठ उत्पादक संघटनेचे महादेव बंडा यांनी केले आहे.

# उरण मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ. व्यंकटेश गिरी, तर सचिवपदी डॉ. अमोल गिरी

**उरण : वार्ताहर**

उरण डॉक्टर्स असोसिएशन ही उरण मधील डॉक्टर्सची संस्था आहे. या संस्थेची नुकतीच झालेल्या जनरल बॉडीच्या बैठकीत, उरण मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ. व्यंकटेश रतनगीर गिरी यांची तसेच डॉ. अमोल ओंकार गिरी यांची सचिवपदी निवड करण्यात आली आहे.

यासोबतच डॉ. सचिन चव्हाण यांची खजिनदार व डॉ. ग्रीष्मा नाकवा याची कल्चरल सेक्रेटरी म्हणून निवड २०२२ ते २०२४ या वर्षासाठी करण्यात आली. या वेळी संस्थाचे नवनिर्वाचित अध्यक्ष व्यंकटेश गिरी यांनी पुढील वर्षात डॉक्टर्ससाठी वेगवेगळे अभ्यास वर्ग आयोजित करण्यात येणार असल्याचे तसेच समाजातील विविध स्तरावर वैद्यकीय शिबोर तसेच मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्याचे सांगितले. या वेळी माजी अध्यक्ष डॉ. प्रीती गाडे, डॉ. पल्लवी पाटील, भक्ती कुंदेलवार तसेच उरण डॉक्टर्स असोसिएशनचे सर्व सभासद व नवी मुंबई उलवे येथील नामांकित डॉक्टर उपस्थित होते.



**मुंबई : सौ. स्नेहा व श्री. प्रदीप गुप्ते यांची कन्या एकता आणि अमेय टिपणीस यांच्या विवाहाचा स्वागत सोहळा शनिवारी झाला. या वेळी पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.**


# रासायनिक सांडपाणी सार्वजनिक ठिकाणी टाकताना टँकर पकडला

## भाजपच्या किरण माळी यांची कामगिरी

**रसायनी : रामप्रहर वृत्त**


जांभिवली येथील एका नाल्यात रासायनिक सांडपाणी सोडण्यास आलेल्या टँकर माजी सरपंच व भाजपचे नेते किरण माळी यांनी रंगेहाथ पकडला.

चावणे येथून शुक्रवारी (दि. ११) रात्री ११ वाजण्याच्या सुमारास रासायनिक सांडपाणी वाहून नेणारा एक टँकर जात असताना किरण माळी यांनी पाहिला. हा टँकर काही दिवसापूर्वीही सांडपाणी टाकून गेल्याची खबर किरण माळी यांना मिळाली होती, त्यामुळे त्यांनी या टँकरचा पाठलाग केला. या वेळी त्यांच्यासोबत कासप येथील सुनील माळी होते. दोघांनी टँकरचा पाठलाग करत जांभिवली येथे टँकर चालकाला अडवले. त्यानंतर टँकरचालकाची चौकशी केली असता त्या टँकरचालकाने उडवाउडवीची



उत्तरे देण्यास सुरुवात केली, परंतु किरण माळी यांनी जर या परिसरात रासायनिक सांडपाणी टाकून परिसर प्रदुषित केला तर तुझी खैर नाही, असा दम दिल्यावर सदर टँकर चालकाने तेथून भरधाव वेगाने पळ काढला.

किरण माळी व सुनील माळी यांनी टँकरचालकाचा पाठलाग केला, परंतु टँकरचालक खोपोलीच्या दिशेने सुसाट वेगाने निघून गेला. चावणे–जांभिवली परिसरात रात्रीच्या वेळेस रासायनिक सांडपाण्याचे टँकर येऊन सार्वजनिक ठिकाणी हे रासायनिक सांडपाणी टाकत असल्याने परिसर प्रदुषित होत आहे, असे किरण माळी यांनी सांगून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने याबाबत कडक कारवाई करावी; अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा किरण माळी यांनी दिला आहे.



# नवी मुंबईत १७ फेब्रुवारीपासून वॉटर टॅक्सी सेवा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई आणि नवी मुंबई दरम्यान कनेक्टिव्हिटीचे आश्वासन देणाऱ्या बहुप्रतिक्षित मुंबई वॉटर टॅक्सी सेवेचे उद्घाटन गुरुवारी (दि. १७) रोजी केंद्रीय नौवहन मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या उपस्थितीत होणार आहे.

अहवालानुसार, सुरुवातीला चारपैकी दोन ऑपरेटर आपली सेवा सुरू करतील. डीसीटी–बेलापूर आणि डीसीटी–जेएनपीटी मार्गांसाठी तात्पुरते दर अनुक्रमे ८०० आणि ५५० रुपये असतील. बेलापूरला जाण्यासाठी मासिक पाससाठी सुमारे १२,००० रुपये मोजावे लागतील. तीन दशकांपूर्वी पहिल्यांदा नियोजित केलेल्या या सेवेमुळे मुंबई आणि नवी मुंबई दरम्यानच्या प्रवासाच्या वेळेत लक्षणीय घट होईल.

सध्या तरी भाडे खूपच जास्त आहे, परंतु प्रवाशांची संख्या वाढल्याने हे दर कमी होतील. इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, सुरुवातीला वॉटर टॅक्सी फेरी वार्फ, माझगाव येथील क्रूझ टर्मिनल आणि बेलापूर टर्मिनल, बेलापूर आणि एलिफंटा लेणी, बेलापूर आणि जेएनपीटी या तीन मार्गांवर चालतील.

भविष्यात अजून काही मार्गांचा विस्तार केला जाईल. इतर मार्गांमध्ये आंतरराष्ट्रीय क्रूझ टर्मिनल ते एलिफंटा, डोमेस्टिक क्रूझ टर्मिनल ते रेवस, करंजाडे, धरमतर, डोमेस्टिक क्रूझ टर्मिनल ते बेलापूर, नेरूळ, वाशी आणि ऐरोली, डीसीटी ते खांदेरी बेटे आणि जेएनपीटी यांचा समावेश आहे.



### प्रवाशांना होणार भरपूर फायदा

*वॉटर टॅक्सीचा वापर वाढल्यास मुंबईकरांचा इंधनावर होणार खर्च, तसेच रस्तेवाहतुकीत होणारी वाहतुक कोंडी, रेल्वेतील गर्दी आणि इतर बऱ्याच त्रासांपासून सुटका होऊ शकणार आहे. प्राप्त माहितीनुसार, मुंबई ते नवी मुंबई हा जलप्रवास वॉटरटॅक्सीने केल्यास तो अवघा १५–२० मिनीटांचा असेल. नवी मुंबईतून मुंबई शहरात कामधंदा आणि नोकरीसाठी दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या लाखांच्या घरात आहे. त्यामुळे या प्रवाशांच्या सेवेसाठी सुखकर मार्ग निवडण्याचे प्रयत्न पाठीमागील प्रदीर्घ काळापासून सुरू होते.*



## संपादकीय

# आयपीएलची श्रीमंती

सोन्याचे अंड देणारी कोंबडी म्हणून ओळखल्या जाणार्‍या इंडियन प्रीमियर लीगची श्रीमंती पुन्हा एकदा जगभरातील तमाम क्रीडारसिकांना अनुभवयाला मिळाली. आयपीएलचा मेगा ऑक्शन दोन दिवस रंगला आणि त्यात अनेक खेळाडू मालामाल झाले. यंदाच्या या लिलावाचे वैशिष्ट्य म्हणजे फ्रँचायझींनी देशी खेळाडूंना पसंती दर्शविली आहे.

**कोरोनाची तिसरी लाट संपण्याच्या मार्गावर असताना सर्वकाही सुरळीत होत जनजीवन पूर्वपदावर आले आहे. मग क्रीडा क्षेत्र तरी त्याला कसे अपवाद ठरू शकते. खेळांच्या स्पर्धा सर्वत्र सुरू असून त्यात खेळाडू आपले कौशल्य, कसब दाखवित आहेत. याआधी शरीरस्वास्थ्य आणि तंदुरुस्ती एवढ्यापुरते मर्यादित असलेल्या खेळात करिअरही होत असल्याचे एव्हाना स्पष्ट झाल्याने त्याकडे तरुणाईचा ओढा कमालीचा वाढला आहे. क्रिकेट हा धर्म मानल्या जाणार्‍या भारतात या खेळाला विशेष महत्त्व आहे. कालपरत्वे इतरही खेळ व खेळाडूंना चांगले दिवस आल्याचे चित्र देशात पहावयास मिळते. याचे श्रेयही क्रिकेट विशेषत: आयपीएलला द्यावे लागेल. आपल्याच देशात नव्हे; तर जगभरातील विविध देशांमध्ये निरनिराळ्या खेळांच्या लीग खेळल्या जात आहेत. इतकी आयपीएल लोकप्रिय झाली असून तिची क्रेझ आजही कायम आहे. गेल्या वेळी कोरोना महामारीच्या काळात ही स्पर्धा संयुक्त अरब अमिरातीमध्ये खेळवली गेली होती. यंदा कोरोनाचा संसर्ग आटोक्यात आल्याने ही स्पर्धा भारतातच खेळवली जाणार आहे. त्यासाठी शनिवार व रविवार असे दोन दिवस बंगळुरूत लिलाव प्रक्रिया झाली. या मेगा ऑक्शनमध्ये मुंबई इंडियन्स, चेन्नई सुपर किंग्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, पंजाब किंग्स, राजस्थान रॉयल्स, कोलकाता नाइट रायडर्स, दिल्ली कॅपिटल्स हे मूळचे आठ आणि लखनौ सुपर जायंट्स आणि गुजरात टायटन्स हे दोन नवे अशा एकूण १० संघमालकांनी सहभाग नोंदवित खेळाडूंवर बोली लावली. आयपीएल ही उगवत्या तार्‍यांची स्पर्धा मानली जाते. इथे फ्रेंचायझी चमकदार कामगिरी करणार्‍या ताज्या दमाच्या खेळाडूंना प्राधान्य देतात. सध्या भारतीय संघाची कामगिरी नफीतुली असली तरी अलीकडच्या काळात देशाच्या विविध भागांतून आलेल्या युवा खेळाडूंनी स्थानिक, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये आपली छाप पाडली आहे. त्यामुळे राष्ट्रीय संघात कुणाची निवड करायची आणि कुणाला बाहेर बसवायचे असा प्रश्न निवड समिती तसेच कर्णधाराला पडत असतो. आयपीएलच्या लिलाव प्रक्रियेतही अशीच चुरस दिसून आली. पहिल्याच दिवशी इशान किशन, दीपक चहर, श्रेयस अय्यर, शार्दुल ठाकूर व हर्षल पटेल या भारतीय उदयोन्मुख खेळाडूंना दहा कोटींच्या वर बोली लागली. यात इशानला सर्वाधिक म्हणजे १५.२५ कोटी रुपये मोजून मुंबई इंडियन्स संघाने आपल्याकडे कायम ठेवले. याशिवाय चहर (चेन्नई सुपर किंग्ज) १४ कोटी रुपये, अय्यर (कोलकाता नाईट रायर्डस) १२.२५ कोटी, ठाकूर (दिल्ली कॅपिटल्स) आणि पटेल (रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरू) प्रत्येकी १०.७५ कोटी दुसर्‍या दिवशीही काही खेळाडूंनी 'भाव खाल्ला'. एकूणच आयपीएलमध्ये खेळाडूंची कोटीच्या कोटी उड्डाणे पहायला मिळाली, तर काही दिग्गज व अनुभवी खेळाडूंना खराब फॉर्ममुळे कुणीही स्वीकारले नाही. त्यांनी वाईट वाटून घेण्याची गरज नाही, कारण या खेळाडूंनी यापूर्वीच्या पर्वांमध्ये चांगली रक्कम घेऊन ही स्पर्धा गाजवलेली आहे. जगातील सर्वांत श्रीमंत क्रिकेट मंडळ असलेल्या बीसीसीआयची आयपीएल स्पर्धा त्याच दिमाखदार रूपात होत आहे. या स्पर्धेत नावापेक्षा फॉर्म महत्त्वाचा आहे.**

# स्वच्छ सर्वेक्षण आणि माझी वसुंधरा!




**वसुंधरा गार्डन..**

***पृथ्वी ज्यावर आधारित आहे त्या भूमी, जल, वायू, अग्नी यांची माहिती देणारे वसुंधरा गार्डन कर्जत शहरात उभे राहत आहेत. तेथे चित्रे आणि प्रतिमांच्या माध्यमातून नागरिकांना पृथ्वी म्हणजे वसुंधरेचा माहिती मिळू शकणार असून संबंधित वृक्षही माहिती मिळविण्याच्या उद्देशाने महत्वाचे ठरणार आहेत.***

**खबरबात**
**संतोष पेरणे**

कर्जत नगर परिषदेने यंदा स्वच्छ सर्वेक्षण अभियान आणि माझी वसुंधरा अभियानासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. स्वच्छ सर्वेक्षण अभियानात देशात थ्री स्टार मानांकन मिळविणार्‍या कर्जत पालिका प्रशासनाने आता २०२२च्या अभियानाची तयारी सुरू केली आहे.

सन २०१९मध्ये स्वच्छ सर्वेक्षण अभियानाला सुरुवात झाली. त्या वेळी पहिल्याच वर्षी कर्जत नगर परिषदेला दोन लाखांचे पारितोषिक मिळाले होते. त्यानंतर सन २०२१मध्ये कर्जत नगर परिषदेने राज्यातील लहान शहरांच्या नगर परिषदांमध्ये बाजी मारली आणि देशपातळीवर थ्री स्टार मानांकन मिळविले. त्याबद्दल पालिकेला नवी दिल्लीत केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या स्वच्छ सर्वेक्षण २०२१च्या पारितोषिक वितरण समारंभात सन्मानित करण्यात आले होते, तर राज्य सरकारच्या माझी वसुंधरा अभियानमध्ये राज्यस्तरावरील कामगिरी केली आहे. आता कर्जत नगर परिषद २०२२च्या स्वच्छ सर्वेक्षण अभियान आणि माझी वसुंधरा अभियानसाठी सज्ज झाली आहे. देशपातळीवर वरच्या क्रमांकात येण्याचे उद्दिष्ट ठेवलेल्या कर्जत पालिका प्रशासनाने या दोन्ही अभियानांसाठी गेल्या एप्रिल महिन्यापासून तयारी सुरू केली आहे.

अभियानाला सुरुवात होताच मोठ्या प्रमाणात जंगली पाच हजार झाडांची लागवड शहरातील मोकळ्या जागी करण्यात आली आहे. शहरातील रस्त्यांवर आकर्षक दिसणारी झाडे लावली असून ही सर्व झाडे पालिकेने स्वतः नर्सरीमध्ये तयार केली आहेत. त्या झाडांची उंची साधारण सहा फूटपेक्षा अधिक असल्याने ही सर्व झाडे मोठ्या दिमाखात बहरली असून शहरातील मोकळ्या जागा या झाडांमुळे बहरल्या आहेत. त्याचवेळी आगामी पावसाळ्यात लावण्यासाठी तब्बल २५ हजार झाडांची तयारी रोपवाटिकेमध्ये सुरू आहे. त्यासाठी पालिकेने शहरालगत असलेल्या कल्पना नर्सरीमध्ये जंगली आणि औषधी झाडांची निर्मिती केली आहे. सध्या त्या नर्सरीमध्ये ही झाडे दोन-तीन फूट आकाराची तयार झाली असून पावसाळ्यात सहा फुटांहून अधिक आकाराची असणार आहेत. शहरात आणखी हरित पट्टे तयार करण्याचे उद्दिष्ट नगर परिषदेने ठेवले आहे. यापूर्वी कर्जत पालिका हद्दीत एकमेव हरितपट्टा होता. त्यात या वेळी आणखी एक हरित पट्टा विकसित केला जात असून मुद्रे येथे हा हरित पट्टा बनवला जात आहे.

माझी वसुंधरा अंतर्गत नर्सरीमध्ये झाडे फुलविण्याची कर्जत नगर परिषदेची पद्धती आर्थिकदृष्ट्यादेखील पैशाची बचत करणारी आहे, तर आगामी दोन महिन्यांत कर्जत शहरातील सर्व झाडांची गणना केली जाणार आहे. त्या झाडांची उंची, जाडी, झाडाचे नाव यांची माहिती संकलित करण्याचे काम पालिका हद्दीत सुरू झाले आहे.वसुंधरेचा समतोल राखण्यासाठी ही वृक्षगणना महत्त्वाची असून शहरात ऑक्सिजनचे प्रमाण वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

कर्जत शहरातील कचरा डेपो मागील काही वर्षे शून्य कचरा डेपो म्हणून ओळखला जात आहे. कचर्‍यावर प्रक्रिया करून त्याचे विघटन करण्यापूर्वी शहरातील कचरा ज्या सात वाहनांमधून गोळा केला जातो त्या घंटागाडी वाहनांना पालिकेने दररोजचे मार्ग ठरवून दिले आहेत. त्या गाड्या नागरिकांच्या दारात दररोज पोहचतात का? त्या वाहनांमध्ये कचरा संकलित होतो काय? याची माहिती घेण्याचाही प्रयत्न तंत्रज्ञानाचा वापर करून घेतला जाणार आहे. शहरात कचरा साठू नये आणि एखाद्या ठिकाणी कचरा साठून राहिल्यास तो काही मिनिटांत उचलला जावा या हेतूने आता पालिकेने घंटागाड्यांना जीपीआरएस कार्यप्रणाली बसविण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रणालीमुळे शहरात कचरा संकलित करणारी वाहने कोणत्या भागात आहेत हे आरोग्य विभागाला तत्काळ कळू शकणार आहे.

कर्जत पालिकेने कचर्‍यापासून पेव्हर ब्लॉक बनविले असून त्या पेव्हर ब्लॉकने बनविलेला रस्ता अधिक टिकाऊ असल्याचे सिद्ध झाले आहे तसेच कचरा डेपोमध्ये येणार्‍या प्लास्टिकचे विघटन करून पालिकेने गतिरोधक बनविले असून ते गतिरोधक राष्ट्रीय महामार्गावर प्रायोगिक तत्वावर परीक्षणासाठी लावले आहेत. त्या गतिरोधकांचे वयोमान राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण वापरत असलेल्या गतिरोधकांपेक्षा अधिक टिकाऊ असल्याचा दावा आहे. आता कर्जतच्या कचरा डेपोमध्ये गतिरोधक आणि पेव्हर ब्लॉक बनविण्याचे उद्दिष्ट वेगवेगळ्या ठिकाणी मागणी घेऊन मागणी तसा पुरवठा या तत्वावर ठेवण्यात येणार आहे.

शहरात जलसंवर्धनासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली असून शहरातील जुन्या आणि पुरातन विहिरींचे नूतनीकरण आणि सुशोभीकरण केले जाणार आहे. विहिरींची स्वच्छता करतानाच खोलीकरण आणि रंगरंगोटी तसेच माहितीपत्रक त्या ठिकाणी लावले जाणार आहे. हे नूतनीकरण मार्च महिन्यात पूर्ण केले जाणार असून सध्या त्या विहिरींमध्ये असलेल्या पाण्याचा वापर झाल्यावर ती कामे पूर्ण केली जाणार आहेत. रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी पालिकेने तयारी केली असून शहरातील गार्डनमध्ये पालिका असा प्रयोग करणार असून नंतर तो खासगी बांधकाम व्यवसायिक यांच्यासाठी लागू करण्याचा प्रयत्न राहणार आहे. त्यासाठी जलसंवर्धन कार्यशाळा पालिकेने आयोजित केली होती.

कर्जत शहरात माझी वसुंधरा मित्र तयार करण्यात आले असून आजच्या घडीला पाच हजारहून अधिकांनी वसुंधरेचे रक्षण करण्याची शपथ घेतली आहे.

शहरातील विजेचे पथदिवे हे अपारंपरिक ऊर्जेच्या माध्यमातून आणि ग्रीन कर्जतच्या हेतूने एलईडी पध्दतीचे लावले गेले आहेत. शहरात आतापर्यंत पाच हजार एलईडी दिवे लागले असून ५० ठिकाणी सोलर पॅनल चौका-चौकात बसविले आहेत. त्यातून शहराचे रात्रीच्या प्रकाशात रुपडे पालटण्यास मदत झाली आहे. पालिकेने स्वतःपासून सुरुवात करण्याचे उद्दिष्ट ठेवून पालिकेच्या टेरेसवर ३० किलो वॅट वीज निर्मिती करणारे सोलर पॅनल बसविले आहेत. त्यातून संपूर्ण कार्यालयाची वीज बचत होऊ लागली आहे.

या वर्षीच्या राज्य सरकारच्या माझी वसुंधरा आणि केंद्र सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षण अभियानात मोठी मजल मारण्यासाठी कर्जत नगर परिषद सज्ज झाली आहे. पालिकेने आगामी काळात सर्व सार्वजनिक ठिकाणी भिंतींचे स्वच्छता संदेशाने रंगविण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्याचवेळी सार्वजनिक शौचालय येथेदेखील स्वच्छता संदेश चित्रांमधून अधोरेखित करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

ग्रीन कर्जतसाठी सायकल ट्रॅक कर्जत शहरात बनविला जात असून शहरात आणि मुख्य रस्त्यांच्या बाजूला ते ट्रॅक असणार आहेत. अशी माहिती पालिका मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी दिली. माझी वसुंधरा अंतर्गत आतापर्यंत शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा पालिकेने भरविल्या असून टाकाऊपासून टिकाऊ या स्पर्धेलादेखील विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. शहरातील जैव-विविधता जपण्याचा नियोजनबद्ध कार्यक्रम पालिकेने हाती घेतला असून कर्जत पालिका या अभियानाच्या माध्यमातून देशात आघाडीवर नेण्याचा सर्वांचा संकल्प आह.

# रोहा तहसीलच्या स्वच्छतागृहाची दुरवस्था

**नागोठणे : प्रतिनिधी**

रोहा तहसील कार्यालयाच्या स्वच्छतागृहाची दूरवस्था झाली असून या परिसरात दुर्गंधी पसरू लागली आहे. त्यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

रोहा तहसील कार्यालयाच्या स्वच्छतागृहाच्या स्वच्छतेकडेच दुर्लक्ष होत असून येथील अवस्था पाहण्यासारखी राहिलेली नाही. हे स्वच्छतागृह तहसील कार्यालयाच्या प्रांगणात असल्याने येथे नेहमी येणार्‍या-जाणार्‍या नागरिकांना तसेच शासकीय कर्मचार्‍यांना दुर्गंधीचा सामना करावा लागतो. यामुळे नागरिकांच्या व कर्मचार्‍यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर स्वच्छतागृहाची तातडीने दुरूस्ती करावी, अशी मागणी होत आहे.



(छाया : राज वैशंपायन)

# वीटभट्टीवरील स्थलांतरित मुलांना शुभ्रा प्रकल्पाकडून साहित्याची मदत

**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि कर्णबधीर यांच्या माध्यमातून सेंद्रिय खतांची निर्मिती करणार्‍या शूभ्रा प्रकल्पाकडून स्थलांतरित मुलांच्या वीतभट्टीवरील शाळेला मदत करण्यात आली आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून स्थलांतरित वीटभट्टी कामगारांच्या मुलांना दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे वाटप करण्यात आले.

कर्जत तालुक्यातील दामत येथील भाविका भगवान जामघरे या कॉलेजमध्ये शिकत असलेल्या तरुणीने सामाजिक बांधिलकी जपत वीटभट्टीवर काम करणार्‍या कामगारांच्या मुलांसाठी शाळा सुरू केली आहे. या प्रकल्पाची माहिती भाग्यश्री वर्तक आणि सेंद्रिय शेतीचा ध्यास घेणारे हेमंत कोंडीलकर यांना मिळाल्यानंतर त्यांनी आपल्या शुभ्रा प्रकल्पाकडून स्थलांतरित मुलांसाठी दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेल्या वस्तूंचे वाटप केले. यामध्ये मुलांना खेळणी, दैनंदिन गरजेच्या वस्तू, साबण, कोलगेट, ब्रश, बिस्कीट यांचे वाटप करण्यात आले.

या वेळी शुभ्रा प्रकल्पाच्या संस्थापिका भाग्यश्री वर्तक, भाविका जामघरे, तिचे वडील भगवान जामघरे, सेंद्रिय शेतीतील यशस्वी प्रयोगशील शेतकरी राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त हेमंत कोंडीलकर यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते किशोर गायकवाड, दत्ता मसणे, अशोक गायकवाड आदी उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्त्या वर्तक यांनी भाविकाचे तसेच आदिवासी कातकरी समाजातील विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि पुन्हा मदत लागल्यास सांगण्याचे आवाहन करून ती मदत तत्काळ पोहचविण्याचे आश्वासन दिले.


## आरोग्य प्रहर

# लिंबाचे अतिसेवन धोकादायक!

आपले शरीर एका वेळी ठराविक प्रमाणापेक्षा जास्त 'व्हिटॅमिन सी' साठवू शकत नाही. त्यामुळे केवळ लिंबूच नाही, तर 'व्हिटॅमिन सी'चे गुणधर्म असलेले इतरही पदार्थ क्षमतेपेक्षा जास्त सेवन केल्यास याचे शरीरावर अपाय दिसून येत असतात. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक केल्यास आरोग्याला हानी पोहचते. लिंबू शरीरासाठी अत्यंत गुणकारी असतो. यामध्ये आढळणारे 'व्हिटॅमिन सी' आपली रोगप्रतिकारशक्ती वाढवण्याचे काम करते.


कोरोना काळात आपली रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी लिंबूवर्गीय पदार्थांचे सेवन करण्याचा सल्ला डॉक्टरांकडून देण्यात येत होता. यात 'व्हिटॅमिन सी' असल्याने यातून रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होत असते. त्यामुळे अनेकांनी लिंबू, संत्री, आवळा आदींचा आपल्या आहारात समावेश केला होता. परंतु आरोग्यासाठी वरदान ठरत असलेल्या या घटकांचे अतिसेवन केल्याने तेच आपल्यावर दुष्परिणाम करू शकतात.

- **मायग्रेनचा होतो त्रास** – लिंबाच्या अतिसेवनामुळे मायग्रेनचा त्रास संभवतो. आंबट पदार्थांमध्ये 'टायरामाइन' असल्याने त्याचा अतिरेक मेंदूच्या मज्जासंस्थेत तणाव निर्माण करतो. त्यामुळे रोज फक्त दोन ते तीन लिंबांचे सेवन करावे, अतिरेकाने शरीराला त्रास होऊ शकतो.
- **ॲसिडीटीचा धोका** – लिंबूमध्ये आढळणारे 'व्हिटॅमिन सी' हे आरोग्यासाठी लाभदायक असले तरी आपले शरीर एका वेळी विशिष्ट प्रमाणात 'व्हिटॅमिन सी' साठवून ठेवू शकते. त्याबाहेर हे प्रमाण गेल्यास ॲसिडीटीचा त्रास होऊ शकतो. म्हणूनच, केवळ लिंबूच नाही, तर 'व्हिटॅमिन सी' जास्त असलेली कोणतीही गोष्ट जास्त खाल्ल्यास ॲसिडिटीचा धोका असतो.
- **पोटदुखी** – जास्त प्रमाणात लिंबू खाल्ल्यानेही पोट खराब होऊ शकते. 'आम्ल रिफ्लक्स'मुळे पोटाचा त्रास निर्माण होऊ शकतो. लिंबूचे सेवन करताना ते प्रमाणात करावे, अतिसेवन केल्याने पोटाच्या समस्या निर्माण होऊ शकतात.
- **दातांची समस्या** – अत्यंत आंबट तसेच लिंबूचे अतिसेवन दातांसाठी हानिकारक आहे. आपले दात लिंबूमध्ये असणार्‍या अम्लीय घटकांबद्दल अत्यंत संवेदनशील असतात. ज्यांना आधीच दातांसंबंधी कोणतीही समस्या आहे, त्यांनी लिंबू किंवा आम्लधर्मीय पदार्थांचे अतिसेवन टाळावे.
- **त्वचेची ॲलर्जी** – लिंबू किंवा 'व्हिटॅमिन सी'च्या अतिरेकामुळे त्वचेच्या विविध समस्या निर्माण होऊ शकतात. लिंबूमध्ये ॲसिडीक गुणधर्म मोठ्या प्रमाणात असल्याने यातून त्वचेवर लाल चट्टे, खाज सुटणे आदी दुष्परिणाम निर्माण होत असतात.



# सुधागडात शस्त्रास्त्रे आणि युद्धकलेची जोपासना

(छाया: धम्मशील सावंत)





**पाली : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचे देदीप्यमान शौर्य साडेतीनशे वर्षांनंतरही जनतेच्या तनामनात आहे. शिवरायांच्या याच रोमहर्षक व थरारक शस्त्रास्त्र व युद्धकलेची माहिती सर्वसामान्यांना व प्रामुख्याने तरुण व लहानग्यांना मिळावी आणि त्यांना या कलेचे प्रशिक्षण मिळून स्वसंरक्षणाचे धडे मिळावेत यासाठी रायगड जिल्ह्यात विविध संस्था व व्यक्ती शिवकालीन शस्त्रास्त्रे व युद्ध कलेची जोपासना करत आहेत. त्यासाठी प्रात्यक्षिके दाखवितात याबरोबरच प्रशिक्षण देखील देत आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील अनेक तरुण व लहान मुले-मुली ही शस्त्रास्त्रे कला अंगीकारत आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सोळाव्या वर्षी तोरणा किल्ला जिंकून मावळ्यांना शारीरिक व्यायामाचे व युद्धकलेचे महत्त्व पटवून दिले. सुधागड तालुक्यातील जय हनुमान आखाडा शिळोशी हे याच शिवकालीन शस्त्रास्त्रे व युद्धकलेच्या माध्यमातून स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण मुलांना देत आहेत. या मंडळाचे अध्यक्ष शरद गोळे हे शिवकालीन कलेचे संवर्धन व्हावे, सर्वसामान्यांना ती कळावी व या केलेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करीत असतात. मागील २० वर्षांपासून कै. भिकू दंत यांच्या प्रेरणेतून जय हनुमान आखाडा मंडळ व गावातील तरुण ही कला जोपासण्यासाठी मेहनत घेत आहेत. या आखाड्यात चार-पाच वर्षांच्या मुलांपासून ते अगदी ४० ते ५० वयोगटातील नागरिकदेखील आहेत. या मंडळाने रायगड जिल्ह्यातील रोहा, कर्जत, खालापूर आदी विविध तालुक्यांमध्ये आपल्या कलेचे प्रदर्शन केले आहे.

श्रीवर्धनमधील शैलेश ठाकूर यांनी २००५पासून अथक परिश्रम करून विविध शिवकालीन शस्त्र जमा केली आहेत. तलवार, भाला, दांडपट्टा, ढाल, विटा व बाण अशा शस्त्रांचा संग्रह त्यांनी केला आहे. शैलेंद्र ठाकूर सामाजिक कार्याबरोबरच कराटे, मल्लखांब व शिवकालीन युद्धकला प्रशिक्षण देतात. शिवचरित्रावर असलेल्या प्रेमातून शिवकालीन शस्त्र जमा करण्याचा छंद ठाकूर यांना लागला आणि शस्त्र जमा करत असताना ती कशी चालवावी या जिज्ञासेपोटी ठाकूर यांनी तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांद्वारे व इतर तज्ज्ञांच्या माध्यमातून शिवकालीन युद्धकले विषयी माहिती घेतली आणि या युद्धकलेचे ज्ञान आत्मसात केले. मागील अनेक वर्षांपासून ते या युद्धकलेचे प्रशिक्षण तरुण व युवकांना देत आहेत. त्याचबरोबर विविध उपक्रमात शिवकालीन युद्धकलेची प्रात्यक्षिके ठाकूर दाखवतात. अशाच प्रकारे जिल्ह्यात काही संस्था, व्यक्ती तसेच शाळांच्या माध्यमातून ही कला जोपासली जात आहे.

> **छत्रपती शिवाजी महाराजांवरील भक्ती व त्यांच्या श्रद्धेतून शिवकालीन युद्धकलेचा अभ्यास केला. तत्कालीन काळातील शस्त्र जमा केली. यासाठी बराच संघर्ष करावा लागला. मुलांसाठी शिवकालीन युद्धकलेचा आखाडा सुरू करणार आहे. स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड जिल्ह्यात ही कला कायम टिकून राहिली पाहिजे यासाठी प्रयत्नशील आहे.**
> **-शैलेंद्र ठाकूर, शिवकालीन शस्त्रास्त्र व युद्धकला प्रशिक्षक**

> **मागील अनेक वर्षांपासून शिवकालीन शस्त्रास्त्र व युद्धकलेची प्रात्यक्षिके करीत आहे. हा वारसा घरातूनच मिळालेला आहे. असंख्य तरुण व मुले-मुली या कलेचे प्रशिक्षण घेत आहेत. चांगले प्रशिक्षण व योग्य सरावाद्वारे प्रभुत्व मिळविता येते. शारीरिक व मानसिक सुदृढता येते तसेच महाराजांच्या युद्धकलेची जोपासना होत असल्याने अभिमानदेखील वाटतो.**
> **-श्रीधर गोळे, तरुण, जय हनुमान आखाडा, शिळोशी**

# वाशी विभागाचा पाणीप्रश्न सुटणार

## आमदार रविशेठ पाटील यांची ग्वाही; काळेश्री हद्दीत रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

**पेण : प्रतिनिधी**

मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला पेण वाशी खारेपाट विभागातील पाणीटंचाईचा प्रश्न या मे महिनाअखेरीस मार्गी लागून प्रत्येक घरात नळाचे पाणी येणार, असा विश्वास पेणचे आमदार रविशेठ पाटील यांनी काळेश्री येथे बोलताना व्यक्त केला.

पेण तालुक्यातील काळेश्री ग्रामपंचायत हद्दीतील काळेश्री ते वाशी प्राथमिक आरोग्य केंद्र या आठ किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामाचे भूमिपूजन तसेच निवारा शेडचे भूमिपूजन आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते रविवारी (दि. १३) करण्यात आले.



या वेळी भाजप पेण तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, माजी सरपंच तुळशीदास पाटील, नरदास पाटील, अशोक पाटील, राजन पाटील, हेमंत ठाकूर, सिद्धार्थ म्हात्रे, काळेश्री ग्रामपंचायत सदस्य मनिषा म्हात्रे, आनंद ठाकूर, उत्तम म्हात्रे आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार रविशेठ पाटील म्हणाले की, वाशी-वढाव विभागाचे माझ्यावर व माझे या विभागाबरोबर प्रेमाचे नाते आहे. या विभागाने विधानसभा निवडणुकीत मला साडे दहा हजार मतांचे मताधिक्य देऊन मला आमदार केले आहे. आपण राजकारणात सक्रिय झाल्यापासून या विभागासाठी विविध विकासकामे करत आलो आहे. आपल्या मंत्रीपदाच्या काळात आपण कोटी रुपयांचा निधी खर्च करून या विभागात विकासकामे केली आहेत. आज मंत्री नसलो तरी एखाद्या मंत्र्यापेक्षा आजही विकास कामे करत असल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले.

या विभागातील पाणीपुरवठा योजनेसाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला. या पाणीपुरवठा योजनेसाठी नेमण्यात आलेला पहिल्या कंत्राटदारामुळे हे काम रखडले होते. मात्र आपण आमदार झाल्यानंतर नवीन कंत्राटदार नेमण्यात आला असून मे अखेर पर्यंत ही योजना कार्यान्वित होऊन प्रत्येक घरात नळाचे पाणी पोहचेल, असा विश्वास आमदार रविशेठ पाटील यांनी या वेळी व्यक्त केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून हर घर जल या योजने तुन अंतर्गत नळ पाइपलाइनसाठीदेखील अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यात आले असल्याची माहिती पाटील यांनी दिली. विकासकामे करताना हेवेदावे, राजकारण थांबवले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी शेवटी विरोधकांना उद्देशून व्यक्त केली.

# दासगावजवळ अपघात

## नऊ जण गंभीर जखमी

**महाड : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर महाडजवळ दासगाव



गावानजीक रविवारी (दि. १३) पहाटे ५.४० वाजण्याच्या सुमारास एका वळणावर स्कॉर्पिओवरील चालकाचा ताबा सुटल्याने गाडी रस्त्याच्या बाजूला २५ फूट खोल खड्यात पडली. या अपघातात नऊ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना महाड ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले आहे.

डोंबिवली ते सातारा जाणारी स्कॉर्पिओ (एमएच ०१ बी एफ -५४५२) ही रस्त्याच्याकडेला २५ फूट खड्डयात कोसळली. या अपघातात वैभव वसंत कदम (वय २५), धीरज वसंत कदम (वय २८), कविता धीरज कदम (वय २६), विमल वसंत कदम (वय ४५), सुनील भागवत कदम (वय ३०), योगिनी सुनील कदम (वय ३६), विराज बाबू कदम (वय १०), अन्वी सुनील कदम (वय ४), ध्रुवी धीरज कदम (वय २) वर्षे सर्व राहणार डोंबिवली असे नऊ प्रवासी जखमी झाले. सर्व जखमींवर महाडच्या ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

# कोकणात जाणाऱ्या प्रवाशांचा 'जीपीएस'मुळे चुकीचा प्रवास

**महाड : प्रतिनिधी**

गेली काही दिवसांपासून मुंबई-गोवा महामार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना गुगल जीपीएस कोकणात जाण्यासाठी महाडच्या अलीकडे दासगावजवळ वांद्रे कोंडचा रस्ता दाखवत आहे. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना जीपीएसच्या चुकीच्या दिशा दर्शकमुळे वांद्रे कोंड वाडीचा खडतर प्रवास करावा लागत आहे. यामुळे वाहनचालकांना नाहक त्रास भोगावा लागत आहे.

मुंबई आणि पुण्यावरून येणाऱ्या आणि कोकणात जाणाऱ्या ज्या प्रवाशांनी गुगल जीपीएस नकाशाचा आधार घेतला त्यांना थेट दासगाव वांद्रे कोंडचा खडतर प्रवास करण्याची पाळी आली आहे. वांद्रे कोंड येथे गेल्यानंतर आपण रस्ता चुकल्याचे लक्षात आल्यानंतर या प्रवाशांनी डोक्याला हात लावला आहे. मुंबईवरून कोकणात जाण्यासाठी मुंबई-गोवा महामार्ग क्रमांक ६६ चा प्रवास करावा लागतो. नव्या ने प्रवास करणारे बहुतांश प्रवासी महामार्गावरून प्रवास करताना जीपीएस गुगल नकाशाचा आधार घेतात. गुगल नकाशा वाहन चालवताना अनेकदा चुकीचा मार्ग दाखवल्याने मनस्ताप सहन करण्याची वेळ अनेकांना यापूर्वी आली आहे.

> **महामार्गावरून येणाऱ्या गाड्या दासगाव वांद्रे कोंड रस्त्याला गेली चार दिवसापासून जात आहेत. एवढ्या गाड्या या गावाकडे का जात आहेत याची विचारणा केली असता त्यांनी गुगल नकाशाने चुकीचा मार्ग दाखवल्याचे सांगितले. सध्या आम्ही या वाहनांना योग्य दिशा दिली जात आहे.**
> **-सालिक अनवारे, स्थानिक रहिवाशी**

मुंबई-गोवा महामार्गा वरून प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांना देखील गेली काही दिवसापासून असाच अनुभव येत आहे.

महाडपासून सात किलोमीटर अंतरावर असलेल्या दासगाव गावाजवळ येताच गुगल मॅप वांद्रे कोंड गावाकडील रस्ता तळकोकणात जाण्यासाठी दाखवत आहे. यामुळे अनेकांची फसगत होत आहे. दासगाव पासून वांद्रे कोंड उंच डोंगरावर दुर्गम भागात वसले आहे. यामुळे चुकीच्या मार्गाने गेलेल्या वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

वांद्रे कोंड येथे गेल्यानंतर गुगल नकाशा चा मनस्ताप चांगलाच देत आहे. दिवसाला किमान दोन हून अधिक वाहने मूळ महामार्ग सोडून वांद्रे कोंड याठिकाणी जात आहे. याबाबत विचारणा केली असता गुगल मॅपवर दासगाव नजीक कोकणात जाण्यासाठी वांद्रे कोंड रस्ताच दर्शवला जात असल्याचे सांगितले. स्थानिक नागरिकांनी याबाबत महामार्ग पोलिसांनादेखील कळवले आहे.

# नेरळ रेल्वेस्थानकातील लिफ्टचे काम पूर्ण

## सुविधा कार्यान्वित करण्याची मागणी

**कर्जत : बातमीदार**

मध्य रेल्वेच्या मुंबई-पुणे या मार्गावरील नेरळ जंक्शन रेल्वेस्थानकात प्रवाशांच्या सोयीसाठी लिफ्टची सोय करावी अशी मागणी होत होती. त्यामुळे रेल्वे बोर्डने नेरळ रेल्वे स्थानकात उदवाहनची व्यवस्था करण्याची मागणी पूर्ण केली आहे. नेरळ रेल्वेस्थानकातील उदवाहनचे काम पूर्ण झाले असून आता ती सुविधा कधी कार्यान्वित होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे तर नेरळ स्थानकात सरकते जिने कधी अस्तित्वात येणार ही मागणी प्रवाशांनी केली असून त्याची पूर्तता करावी, अशी मागणी होत आहे.

नेरळ रेल्वेस्थानकात नवीन पादचारी पुलाची निर्मिती झाल्यांनतर त्याची उंची पाहून सर्वांची दमछाक होत होती. तब्बल ४७ पायऱ्या एका बाजूला असलेल्या त्या पादचारी पुलाबाबत सतत तक्रारी येत होत्या. त्यानंतर स्थानिकांनी उदवाहन आणि सरकते जिने उभारण्याची मागणी केली होती. त्यानुसार नेरळ स्थानकात उदवाहन उभारण्याचे काम पूर्ण झाले आहे. आता नेरळ स्थानकात फलाट दोनवर उभारलेल्या उदवाहनचे लोकार्पण लवकर व्हावे अशी मागणी नेरळ रेल्वे प्रवासी संघटना अध्यक्ष संदीप म्हसकर यांनी आहे. त्याचवेळी फलाट दोनवर उदवाहन उभारल्यानंतर फलाट एक वर पादचारी पूल पार करताना लागणाऱ्या ४७ पायऱ्यांचा चढाव ज्येष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी आणि महिला प्रवासी यांच्यासाठी दमछाक करणारा ठरत आहे. त्यामुळे त्या ठिकाणी सरकते जिने बसविण्याची मागणी रेल्वे प्रवासी सातत्याने करत असतात.

नेरळ प्रवासी संघटनेने नेरळ स्थानकात प्रवाशांसाठी निवारा शेड, फलाट एकवर स्वच्छतागृह तसेच कर्जत एन्डकडे पादचारी पूल आणि फलाट एकवरील तिकीट खिडकी दिवसभर सुरू ठेवण्याची मागणी केली जात आहे, मात्र प्रवाशांची पादचारी पूल करताना सुरू असलेली दमछाक कमी करण्यासाठी काम पूर्ण केलेल्या उदवाहनबद्दल रेल्वे प्रवासी संघटनेने रेल्वे बोर्डचे आभार मानले आहेत.



# ब्रम्हगुरू फाउंडेशनतर्फे आदिवासीवाडीत ब्लँकेटचे वाटप

**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुक्यातील नसरापूर ग्रामपंचायतमधील आदिवासी वाड्यांमधील आदिवासी लोकांसाठी माघी गणेशोत्सवाच्या निमित्ताने ब्रह्मगुरु फाउंडेशनच्या वतीने ब्लँकेट वाटप करण्यात आले.




ग्रुप ग्रामपंचायत नसरापूर हद्दीतील कळंबोली, सालवड आदिवासी वाडी येथे आदिवासी बांधवांना माघी गणेश उत्सवाच्या निमित्ताने ब्रम्हगुरु फाऊंडेशनच्या माध्यमातून ब्लँकेट वाटप करण्यात आले. समाजातील आदिवासी बांधवांना अनेक सुखसुविधा मिळाव्या हा मुख्य उद्देश या संस्थेचा असून त्यासाठी ही संस्था कार्य करत आहे. आदिवासी बांधवांचे थंडीपासून रक्षण होण्यासाठी संस्थेमार्फत २०० ब्लँकेट वाटप करण्यात आले. चिंचवली-गणेगाव येथे गरजू व्यक्तींना ब्लँकेट वाटप करण्यात आले. या वेळी ब्रह्मगुरू फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत शिवाजी शिंदे, ट्रस्टी ब्रिजेश राजेंद्र सिंग, कॅप्टन अंशु अभिषेक, प्रशांत ब्रिजेश सिंग, सत्यम देवेंद्र सिंग यांच्या मार्फत ब्लँकेट वाटण्यात आले. या वेळी ग्रामपंचायतच्या सरपंच साक्षी संतोष मोहिते, सदस्य ॲड. संपत पांडुरंग हडप, शैला नामदेव हिलम, ज्येष्ठ ग्रामस्थ दशरथ बाबुराव देशमुख उपस्थित होते.

# 'अवकाळी'मुळे पांढऱ्या कांद्यावर परिणाम; उत्पादनात ५० टक्के घट

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अवकाळी पाऊस, ढगाळ वातावरण, उष्ण, दमट, थंड अशा वातावरणामुळे पांढऱ्या कांद्याच्या लागवडीमध्ये करपा रोग श्रीप्स तसेच किडीचा रोग अशा विविध समस्येने या वर्षी शेतकऱ्यांच्या ५० टक्के उत्पादनात घट झाली आहे.

अलिबाग तालुक्यातील प्रगतशील शेतकरी सतिश म्हात्रे व रंजन म्हात्रे यांनी निसर्गाच्या अनेक समस्यांवर मात करून कठोर परिश्रम व सातत्याने मेहनत घेवुन शासनाच्या कृषी अधिक्षक रायगड जिल्हा व सर्व कृषी अधिकारी तसेच सृष्टी ग्रोचे प्रधान सर तसेच रोहा येथील शास्त्रज्ञ जितेंद्र कदम व त्यांचे सहकार्याचे मार्गदर्शन लाभल्याने सुमारे ५० खंडी पांढऱ्या कांद्याचे उत्पादन यशस्वी झाले आहे.



पांढऱ्या कांद्याचे लागवड, बेणणी, काढणी, माला बांधणे तसेच खते, औषधे, मजुर वर्ग, देखभाल व मार्केटींग याकरीता सुमारे तीन एकर शेतजमिनीत पांढरा कांदा उत्पादन घेण्यासाठी सुमारे चार लाख रुपये खर्च आला आहे. तरीही अभ्यासपुर्वक कुशल प्रयत्नाने चार ते पाच लाख रुपये निव्वळ नफा मिळणे उपेक्षित आहे. महत्त्वाचे म्हणजे पांढऱ्या कांद्याची लागवड नोव्हेंबर ते मार्च पर्यंत अनेक महिला वर्गाला रोजगाराची संधी निर्माण झाली त्यामुळे महिला वर्गात समाधनाचे वातावरण आहे तसेच पांढ्या कांद्याची वाढती मागणी लक्षात घेता यावर्षी मुंबई, नवी मुंबई, रायगड जिल्हा, पुणे, कल्याण, डोंबिवली आदि परिसरात पांढऱ्या कांदयाला जोरदार मागणी असुन मालाचा पुरवठा केला जात आहे.

बदलते हवामान अवकाळी पाऊस यामुळे अलिबाग तालुक्यातील पांढऱ्या कांद्याचा उत्पादन घेणारा शेतकरी हतबल झाला आहे. तसेच शेतकरी वर्गाला दिलासा देण्यासाठी व त्यांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी सहानभुती पुर्वक विचार करणे गरजेचे आहे.




# वणवा प्रवृत्ती जळायला हवी!

'एकच देऊ नारा संपवू वणवा सारा' हे ब्रीद डोळ्यासमोर ठेवून स्वर्गीय निसर्ग सौंदर्य लाभलेले अखंड कोकण वणवामुक्त व्हावे म्हणून गेल्या दोनेक वर्षांपासून 'वणवा मुक्त कोंकण' कार्यरत झाली आहे. 'सह्याद्री निसर्ग मित्र' संस्थेच्या माध्यमातून काम करणाऱ्या टीमला या काळात आलेले सर्वांगीण अनुभव पाहाता वणवा लागणारच नाही यासाठी समाज म्हणून आपण सर्वांनी जागरूक राहाणे आवश्यक असल्याचे स्पष्ट होऊ लागले आहे. वणवा न लावता, न लावू देता सामाजिक स्तरावर वणवा जाळण्याऐवजी वणवा लावणारी प्रवृत्ती जळून जाण्याची आवश्यकता आहे.

कायद्याने गुन्हा असलेली वणवा लावण्याची प्रवृत्ती नष्ट होण्यासाठी सध्याच्या जंगलातील वणव्यांच्या ऋतू हंगामात जनजागृतीची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर चिपळूणमध्ये 'वणवा'मुक्ती साठी कार्यरत संस्था, ग्रामपंचायती, व्यक्ती यांचा सोमवारी (दि. १४) सन्मान सन्मान सोहळा होत आहे. वणवा हा अतिशय चिंताजनक विषय आहे. यातले जेमतेम १५ टक्के वणवे नैसर्गिक तर बहुसंख्य मानवनिर्मित असतात. मागे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांदा तालुक्यातील डिंगणे गावी वाळलेल्या गवताच्या कुरणांमुळे ५०० एकरांवर नैसर्गिक वणवा भडकून काजू, आंबा आणि नारळीच्या बागांचे मोठे नुकसान झाले होते. ९० शेळ्या, दोन घरे व ९५ बोकडांचा या वणव्यात होरपळून मृत्यू झाला होता. मुंबई-गोवा महामार्गावर कशेडी घाटासह अनेक भागात लावले जाणारे वणवे वाहतूक थांबविण्यास कारणीभूत ठरत असतात. भारतीय वन सर्वेक्षणाच्या अहवालानुसार वणवा लागण्याच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य पहिल्या दहात आहे.

'वणवा' संदर्भातील अभ्यासपूर्ण भूमिका निश्चित करताना, वणवा लागल्यानंतर त्या आडभागात कसे पोहोचायचे? आग विझवायला काय वापरायचे? त्याकरिताचे आर्थिक नियोजन याचा उलगडा होत नाही. म्हणून 'वणवा लागूच नये' यावर काम करण्याची आवश्यकता जाणवते. जंगलमाफियांकडून मुद्दाम आगी लावल्या जातात. पुढे त्यात होरपळलेल्या झाडांचा लिलाव केला जातो. वनौषधी, वनसंपत्ती गोळा करण्यासाठी आणि जंगल पर्यटसाठी गेलेल्या माणसांकडून निष्काळजीपणे आणि काहीवेळा जाणुनबुजून केलेल्या कृत्यामुळे वणवे लागतात. वनातून जाताना पेटती सिगारेट फेकणे, टेंभे (मशाल, पलिते) घेऊन जाणे, कॅम्पवरील आग तशीच सोडून जाणे, शेतीबांधावरील लावलेली आग आदिंमुळे वणवे लागतात. कोकणात वणवे लागण्यापेक्षा वणवे लावण्याचे प्रणाम अधिक आहे, म्हणून जनजागृती आवश्यक आहे.

वणवा विझवण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होत असतो, पण आग लागू नये म्हणून जाळरेषा आणि आग लागल्यानंतर विझवण्यासाठी झाडाच्या फांद्या या पलिकडे आम्ही जात नाही. वणवा लागलेल्या एखाद्या जंगलाचे आत्मवृत्त ऐकायला बसलो तर एखादे संवेदनशील मन उद्ध्वस्त होऊ शकते. वणवा लागल्यावर नियंत्रण मिळवणे कठीण आहे. यावरील सर्वांत सोपा उपाय हा आग लागूच न देणे हाच आहे. अर्थात सर्वच ठिकाणी अशी अपेक्षा करणे व्यवहार्य नाही आहे. जंगलांमध्ये जेव्हा जोरदार वारा वाहू लागतो त्यावेळी एकमेकांच्या आसपास असलेल्या झाडांच्या फांद्या आपापसात एकमेकांवर घासून घर्षणाने आग निर्माण होत असते. ही आग हळूहळू तेथील पालापाचोळ्याला लागून संपूर्ण जंगलात पसरते. कोकणात लागणारे वणवे 'नैसर्गिक' या कक्षेत बसत नसल्याने त्यातून होणारी नैसर्गिक हानी पाहाता कोकणात वणवे रोखायला हवे आहेत. आपल्याकडे जंगलांना मुद्दामहून आगी लावल्या जातात हे वास्तव आहे. आगीमुळे पर्यावरणाची हानी होते. वातावरणातील कार्बन डायऑक्साईड वाढतो. त्याचा प्रतिकूल परिणाम विश्वाचे तापमान वाढीमध्ये दिसून येतो आहे.

थंडी संपून उन्हाळा सुरु झाला की वणव्यांचा प्रश्न गंभीर बनतो. कोकणात दिवसाला कुठेना कुठे एक वणवा अशी भयंकर स्थिती निर्माण होत असते. तंत्रज्ञान कितीही विकसित झाले तरी पर्यावरणस्नेही उपायांचा विचार करता पेटलेला वणवा विझवणे कठीण आहे. कोकणात फळबागांना लागणाऱ्या वणव्यांमुळे 'नको ती शेती' म्हणण्याची वेळ शेतकऱ्यावर आल्याची उदाहरणे आहेत. वणवा ही कोकणच्या सौंदर्याला लागलेली कीड आहे.

**-धीरज वाटेकर, सदस्य वणवा मुक्त कोकण संस्था**


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरीता संपादित होणाऱ्या जमिनीच्या साडेबावीस टक्के योजनेंतर्गत वाटप करण्यात आलेल्या मौजे चिंचपाडा, निवाडा यु. के. क्र. CHIM-ICIG-४६ मधील बांधकाम क्र. M-२४६, M-२४६A, M-२४६B, M-२४८ या बांधकामाखालील जमिन बांधकामधारक पांडुरंग रामचंद्र केणी, विनोद लहु केणी, सागर अंकुश केणी यांच्याकडून संपादित झालेली आहे. या मिळकतीपोटी त्यांना पुष्पक नोड वडघर येथील (१) भूखंड क्र. २०८B, सेक्टर-आर-४, क्षेत्र २८० चौ.मी. (२) भुखंड क्र. ६५, सेक्टर-आर-२, क्षेत्र ७०० चौ.मी. चे वाटपपत्र देण्यात आलेले आहे.

आता जमिन बांधकामधारक पांडुरंग रामचंद्र केणी, विनोद लहु केणी, सागर अंकुश केणी यांनी त्यांना वाटपित झालेला पुष्पक नोड येथील (१) भूखंड क्र. २०८B, सेक्टर-आर-४, क्षेत्र २८० चौ.मी. (२). भुखंड क्र. ६५, सेक्टर-आर-२, क्षेत्र ७०० चौ.मी. या भुखंडाबाबत दुय्यम निबंधक पनवेल नोंदणी क्र. पवल ४-१७२-२०२२ दि. ०६/०१/२०२२ यांच्याकडील नोंदणीकृत केलेले हक्कसोडपत्र सादर केले असुन सदरील हक्कसोडपत्रात नमूद केल्यानुसार त्यांना वाटपित झालेल्या भुखंडाबाबत खालील खातेदारांच्या लाभात हक्क सोडले आहेत.

| अ. क्र. | निवाड्यातील जाहीर खातेदार हक्कसोडपत्र लिहून घेणार (i) | निवाड्यातील जाहीर खातेदार हक्कसोडपत्र लिहून देणार (ii) |
|---|---|---|
| १ | पांडुरंग रामचंद्र केणी | ०१. विनोद लहु केणी<br>०२. सागर अंकुश केणी |

उपरोक्त हक्कसोडपत्रानूसार सिडकोकडून केवळ टेबल क्र. (i) मध्ये नमुद केलेल्या व्यक्तीच सदरील भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरू शकतात. हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नावे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत अशा व्यक्तीच्या नावे सिडकोकडून भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा करुन भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसापर्यंत कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

तरी वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि), तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील वाटपित भूखंडाबाबत सिडको तर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४२६/२०२१-२२



# सुभाष पुजारी दुसऱ्यांदा मास्टर महाराष्ट्र श्री

**पनवेल : वार्ताहर**

महामार्ग पोलीस केंद्र पळस्पेचे प्रभारी अधिकारी सहाय्यक निरीक्षक सुभाष पुजारी यांनी नुकत्याच झालेल्या शरीरसौष्ठव स्पर्धेत मास्टर महाराष्ट्र श्री हा बहुमान दुसऱ्यांदा पटकावून या प्रकारात आपला दबदबा किती आहे हे दाखवून दिले. त्यांची पाँडिचेरी येथे देश पातळीवरील होणाऱ्या मास्टर भारत श्री स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

पाँडिचेरी येथे होणाऱ्या शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी महाराष्ट्रातर्फे सुभाष पुजारी सहभागी होणार असून राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. ही बाब महाराष्ट्रासाठी व महाराष्ट्र पोलीस दलासाठी अभिमानास्पद आहे. त्यामुळे महाराष्ट्र पोलीस दलाची प्रतिमादेखील अधिक उंचावली गेली आहे.



जिद्द, चिकाटी व परिश्रम याचे उत्तम व आदर्श उदाहरण म्हणजे सुभाष पुजारी. त्यांनी यापूर्वीही आंतरराष्ट्रीय पातळीवर शरीरसौष्ठव या प्रकारामध्ये चमकदार कामगिरी व घवघवीत यश संपादन करून विदेशी भूमीवर भारताचा झेंडा फडकावला आहे.

सुभाष पुजारी यांना महाराष्ट्र पोलीस दलातून पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा मिळाल्याच आहेतच, परंतु महाराष्ट्रातील इतर सर्व क्षेत्रांतूनदेखील शुभेच्छांचा वर्षाव झाल्याचे दिसून येते. पाँडिचेरी येथे होणाऱ्या स्पर्धेकरिता शुभेच्छा व जागतिक पातळीवर अव्वल येण्याचे त्यांचे जे ध्येय आहे त्या ध्येयाला गवसणी घालण्याकरिता त्यांना सर्वांकडून शुभेच्छा देण्यात येत आहेत.



**खारघर : कडवा पाटीदार युवक मंडळाच्या वतीने परिवार कप २०२२ क्रिकेट स्पर्धेचे सेक्टर १९ येथील मैदानात आयोजन करण्यात आले होते. दोन दिवस रंगलेल्या या स्पर्धेला पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शनिवारी भेट देऊन खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. त्यांचे आयोजकांनी स्वागत केले. या वेळी भाजप शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, युवा नेते समीर कदम, पाटीदार युवक मंडळाचे अध्यक्ष अश्विन पटेल, विनोद पटेल, सल्लागार राजू पटेल, रसिक चौहान, फुलाजी ठाकूर आदी उपस्थित होते.**



**कामोठे : येथील जुई गावातील मैदानात सी. बी. ट्रॉफी ही डॉक्स प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली असून यंदाचे स्पर्धेचे सातवे वर्ष आहे. या वेळी आबासाहेब भोर, अतुल औटी, मंगेश जाधव, विनोद वाणी, सुधीर जाधव यांच्यासह क्रिकेटरसिक उपस्थित होते.**

# पंचक्रोशी कबड्डी स्पर्धेत यशवंतखार संघ विजेता

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराज पंचक्रोशी विभाग आयोजित कबड्डी स्पर्धेत यशवंतखार संघाने विजेतेपद पटकाविले, तर स्वयंभू भातसई संघ उपविजेता ठरला.

स्पर्धेत तृतीय क्रमांक गावदेवी भातसई आणि चतुर्थ क्रमांक मालसई या संघाने मिळविला. वैयक्तिक पारितोषिक सामनावीर म्हणून विराज गुंड (यशवंतखार), उत्कृष्ट पकड तुतेश खरिवले (भातसई), उत्कृष्ट चढाई सुयोग आयरे (मालसई) आणि पब्लिक हीरो रोशन मढवी (यशवंतखार) यांना देण्यात आले.



(छाया : महादेव सरसंबे)

## न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या वनडेत भारतीय महिला संघ पराभूत

**क्वीन्सटाऊन : वृत्तसंस्था**

यजमान न्यूझीलंड महिला क्रिकेट संघाने शनिवारी भारताविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात ६२ धावांनी विजय मिळविला. भारतीय कर्णधार मिताली राजची अर्धशतकी खेळी व्यर्थ ठरली.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या न्यूझीलंडने आव्हानात्मक २७५ धावा केल्या. यात सुझी बेट्सच्या शतकाचा (१११ चेंडूंत १० चौकारांसह १०६ धावा) सिंहाचा वाटा होता. त्यानंतर धावांचा पाठलाग करताना भारताचा डाव ४९.४ षटकांत २१३ धावांत आटोपला. पाच सामन्यांच्या मालिकेत न्यूझीलंडने १-० अशी आघाडी घेतली आहे.

# कर्णधार रोहितकडून मधल्या फळीतील फलंदाजांचे कौतुक

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत भारताने मिळवलेल्या ३-० अशा निर्भेळ यशाचे श्रेय कर्णधार रोहित शर्माने मधल्या फळीतील फलंदाजांना दिले. श्रेयस अय्यर, सूर्यकुमार यादव यांच्या फलंदाजीचेही त्याने कौतुक केले.

अहमदाबादची खेळपट्टी गोलंदाजांसाठी अनुकूल होती, मात्र तरीही पहिल्या दोन सामन्यांत सूर्यकुमारने दिमाखदार फलंदाजी केली. तिसऱ्या सामन्यात श्रेयस आणि ऋषभ पंत यांनी कामगिरी उंचावली, असे रोहितने सांगितले. मधल्या षटकांना सामोरे जाणे आव्हानात्मक होते. परंतु मधल्या फळीने परिस्थितीनुसार सकारात्मक फलंदाजी केली, असे रोहित म्हणाला.

एकदिवसीय क्रिकेटमध्ये चार, पाच आणि सहा हे क्रमांक अत्यंत महत्त्वाचे असतात. या क्रमांकांवर भारताच्या काही गाजलेल्या क्रिकेटपटूंनी आपली छाप पाडली आहे, असेही रोहितने आवर्जून सांगितले.

विराट कोहलीकडून शतक साकारलेले नाही, पण दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत त्याने तीन सामन्यांत दोन अर्धशतके झळकावली आहेत. त्यामुळे त्याच्या कामगिरीत काही समस्या नाही, असे एका प्रश्नावर रोहितने सांगितले.

# अश्विन व बटलर एकाच संघात आल्याने सोशल मीडियावर मीम्स

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

आयपीएल १५व्या हंगामासाठीच्या लिलावात पहिल्या दिवशी राजस्थान रॉयल्सने त्यांच्या संघात रविचंद्रन अश्विनला पाच कोटी रुपये मोजून घेतले, तर लिलावाआधी इंग्लंडचा विकेटकिपर जोस बटलरला त्यांनी रिटेन केले होते. यामुळे आता सोशल मीडियावर मीम्स व्हायरल होत आहेत. याचे कारण म्हणजे हे दोघेही आयपीएलमध्ये मंकडिंग वादात होते. आता दोघेही एकाच संघात आल्याने बटलरला अश्विन मंकडिंग करेल याची भीती उरणार नाही अशा कमेंटस चाहत्यांनी सोशल मीडियावर केल्या आहेत.

आयपीएल २०२२च्या लिलाव प्रक्रियेवेळी पहिल्या दिवशी राजस्थान रॉयल्सने पाच कोटी रुपयांमध्ये भारताचा फिरकीपटू आर अश्विनला संघात घेतले. आता तो इंग्लंडचा क्रिकेटपटू जोस बटलरसोबत संघात असेल. बटलरला राजस्थानने संजू सॅमसन आणि यशस्वी जयस्वाल यांच्यासोबत रिटेन केले होते.

अश्विन आणि बटलर यांच्यात २०१९च्या आयपीएलवेळी वाद झाला होता. अश्विनने मंकडिंग पद्धथीने धावबात केल्याने बटलरसोबत त्यांच्यात कटुता निर्माण झाली होती. राजस्थान रॉयल्स आणि किंग्ज इलेव्हन पंजाब यांच्यातील सामना सुरू होता. तेव्हा अश्विनने नॉन स्ट्रायकरला असलेल्या बटलरला बाद केले. बॉल टाकण्याआधी क्रीजमधून पुढे गेल्याने अश्विनने बाद केल्यानंतर नियमावरून थोडा वादही झाला होता.



## रहाणेला पुन्हा मिळाली आयपीएलमध्ये खेळण्याची संधी

**मुंबई : प्रतिनिधी**

इंडियन प्रीमियर लीगच्या १५व्या सिझनच्या मेगा लिलावात अनेक मोठ्या खेळाडूंवर बोली लावण्यात आली. यामध्ये भारताचा खेळाडू अजिंक्य रहाणे कोलकाता नाईट रायडर्सच्या (केकेआर) ताफ्यात दाखल झाला आहे.



**'केकेआर'ने घेतले ताफ्यात**

रहाणेला आयपीएलचा चांगला अनुभव आहे. पण लिलावात त्याला अनेक अडचणींचा सामना करावा लागला. आयपीएलच्या लिलावात अगदी शेवटच्या क्षणी केकेआरने त्याला आपल्या संघात स्थान दिले. त्याला एक कोटी रुपये ही किंमत मिळाली. त्यामुळे आता रहाणे केकेआरकडून खेळताना दिसेल.

याआधी दिल्ली कॅपिटल्स, राजस्थान रॉयल्स आणि रायझिंग पुणे सुपरजायंट्सकडून खेळलेल्या रहाणेची एक कोटी ही मूळ किंमत होती. रहाणेने राजस्थान रॉयल्सचे कर्णधारपदही भूषवले होते, मात्र आता खराब फॉर्ममुळे त्याला आयपीएलमध्ये फक्त एक कोटी रुपयांची बोली लागली.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ८

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. लाईफ इन्शुरन्स ऑफ कार्पोरेशन (एलआयसी) चे मुख्यालय या शहरात आहे.**
***अ.)*** दिल्ली ***ब.)*** कलकत्ता ***क.)*** मुंबई ***ड.)*** चेन्नई

**२. अदानी उद्योग समूहातील कोणत्या कंपनीची अलीकडे शेअर बाजारात नोंद झाली?**
***अ.)*** अदानी इंटरप्रायझेस ***ब.)*** अदानी विल्मर ***क.)*** अदानी ग्रीन एनर्जी ***ड.)*** अदानी पॉवर

**३. पुढीलपैकी कोणती कंपनी आर्टीफिशीयल इंटलिजियन्स क्षेत्रात काम करणारी नाही?**
***अ.)*** टाटा एलक्सी ***ब.)*** हॅपीइस्ट माइंड ***क.)*** झेन्सर टेक्नोलॉजीस ***ड.)*** बीएएसएफ इंडिया






**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com